रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर


◆ वर्ष १८ ◆ अंक ३३४
www.ramprahar.com

◆ सोमवार, २२ जून २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

खारघरमध्ये आठ लाखांचे कोकेन, एमडी जप्त/२
एल निनोची चाहूल-पाणी अडवण्याची जबाबदारी/४
इंग्लंडविरुद्ध मालिकेसाठी भारतीय संघ जाहीर/८

## दिलासा! मुंबई, पुण्यासह राज्यात पावसाच्या सरी



**मुंबई :** दीर्घ प्रतीक्षेनंतर अखेर मुंबईत पावसाने रविवारी (दि.२१) हजेरी लावली. दक्षिण मुंबई असो की उपनगरे सकाळपासूनच अनेक भागांत पावसाची संततधार सुरू झाली. त्यामुळे हवेत अचानक गारवा निर्माण होऊन नागरिकांना उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाला. पुणे, पिंपरी-चिंचवड, साताऱ्यातही पावसाच्या सरी बरसल्या. ढगांच्या गडगडाटासह आणि विजांच्या कडकडाटात पावसाने दमदार एण्ट्री केली. इकडे रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्गमध्येदेखील पावसाची रिपरिप पाहायला मिळाली. हवामान खात्याने २० जूननंतर राज्यात पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज वर्तवला होता. त्यानुसार पावसाचे आगमन झाले असून तो सक्रिय राहावा, अशीच सर्वजण कामना करीत आहेत. वरुणराजा जोरदार बरसल्यास रखडलेल्या शेतीकामांना वेग येणार आहे. यासाठी शेतकरीही आकाशाकडे डोळे लावून बसले आहेत.

# महिला शेतकऱ्यांना कायदेशीर दर्जा देणार

## ■ अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्री फडणवीस यांची माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**



राज्य विधिमंडळाचे सोमवारपासून सुरू होणारे पावसाळी अधिवेशन पूर्ण वेळ म्हणजे तीन आठवडे चालणार असून यामध्ये सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचे अनेक मोठे निर्णय घेतले जातील. या अधिवेशनात सरकार एकूण १० महत्त्वाची विधेयके मांडणार आहे. यामध्ये शेतात राबणाऱ्या पण उपेक्षित राहिलेल्या महिला शेतकऱ्यांना कायदेशीर दर्जा देण्याचे अत्यंत क्रांतिकारी विधेयक सरकार घेऊन येत आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी (दि.२१) दिली.

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्यासह वरिष्ठ मंत्री उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कृषी सर्व्हे करताना लक्षात आले की शेतीच्या क्षेत्रात सर्वात जास्त काम करणाऱ्या महिला आहेत, मात्र तरीही महिलांना शेतकऱ्यांचा अधिकृत दर्जा नाही किंवा महिलांच्या नावावर शेती नसल्यामुळे त्यांना शेतकरी समजले जात नाही, पण आता या अधिवेशनात आपण महिला शेतकऱ्यांना कायदेशीर दर्जा देऊन त्या शेतकरी असल्याचा दाखला देणार आहोत. याबरोबरच आणखी काही विधेयकेदेखील मांडण्यात येणार आहेत.

शेतकरी कर्जमाफीवर बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, कोणतीही निवडणूक डोळ्यांसमोर नसताना आम्ही ही कर्जमाफी केली आहे. विधानसभा नाही, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आम्ही आधीच जिंकलो आहोत. त्यामुळे २०२९च्या निवडणुकीचा विचार करून आम्ही थांबलो नाही. कर्जमाफी आमच्यासाठी राजकीय विषय नसून शेतकरी जगला पाहिजे आणि त्याला पुन्हा उभे राहण्याची ताकद मिळाली पाहिजे हाच आमचा हेतू आहे. कोणत्याही कर्जमाफीने शेतकरी श्रीमंत होत नाही, पण परिस्थितीनुसार मदत करावी लागते. यासाठी आम्ही स्थापन केलेल्या तज्ज्ञ समितीच्या अहवालानुसार काही निकष ठरवले आहेत. या कर्जमाफीमुळे राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा फायदा होणार आहे.

राज्यातील पावसाच्या परिस्थितीवर चिंता व्यक्त करताना मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांना महत्त्वाचे आवाहन केले. एल-निनोमुळे यंदा पाऊस खूप लांबला आहे. जून महिन्यामध्ये सरासरीपेक्षा ८० टक्के कमी पाऊस पडला असून ही चिंतेची बाब आहे. कोकणात २३ जूनपासून पावसाचा जोर वाढेल, मात्र विदर्भ आणि मराठवाड्यात कमी पाऊस राहण्याची शक्यता आहे. जुलैच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पावसाची चिन्हे कमी असल्याने शेतकऱ्यांनी दुबार पेरणीची वेळ येऊ नये म्हणून पेरणीची घाई करू नये. पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्यासाठी योग्य पाऊस पडेपर्यंत पाणी उपसा करण्यावर बंदी घालण्यात आली आहे, असेही त्यांनी सांगितले.

अधिवेशनात आमचा प्रयत्न संवादाचाच असून विरोधकांनी हिताची चर्चा केली, तर हितकारक उत्तरे मिळतील, मात्र राजकारण केले तर राजकीय उत्तर दिले जाईल, असा इशाराही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिला.

## विरोधकांकडे स्वतःचे विषय, कल्पकता किंवा प्रश्नांचे आकलन उरलेले नाही!

यावेळी विरोधकांच्या बहिष्कारावर खोचक टोला लगावताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, विरोधक चर्चेला आले असते, तर निश्चित संवाद घडला असता, मात्र त्यांनी येण्याऐवजी आधीच सह्या गोळा करून सहा पानांचे पत्र जोडले आहे. विरोधकांनी पाठवलेले हे पत्र पाहिले तर ते एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) आणि चॅटजीपीटीच्या मदतीने तयार केल्याचे स्पष्ट दिसते. म्हणजे पत्र लिहिण्यासाठीही आता विरोधकांकडे स्वतःचे विषय, कल्पकता किंवा प्रश्नांचे आकलन उरलेले नाही, पण एका गोष्टीचा आनंद आहे की ते तंत्रज्ञानाचा उपयोग करत आहेत. यासाठी मी त्यांचे अभिनंदन करतो. त्यांच्या पत्रातील एक पॅराग्राफ तर २०२३पासून तोच आहे. त्यावर कारवाई झाली तरी तोच मजकूर पुन्हा टाकला जातो. लोकांना अपेक्षित असलेले मुद्दे विरोधकांना माहीतच नाहीत. जयंतराव पत्रकार परिषदेला वेळेवर पोहचले, कारण आम्ही कनेक्टिंग लिंक तयार केल्यामुळे ते ट्रॅफिकमध्ये अडकले नाहीत. विरोधकांचा अल-निनोलासुद्धा आमच्याशी जोडण्याचा प्रयत्न सुरू आहे; हेसुद्धा त्यांनी चॅटजीपीटीला विचारले असते तर असे विधान केले नसते, अशी कोपरखळी मुख्यमंत्र्यांनी मारली.

# जागतिक योग दिनानिमित्त प्रबळगड माची येथे योगसाधना

## आमदार प्रशांत ठाकूर यांचा प्रेरणादायी सहभाग | युवकांना दिला निरोगी जीवनशैलीचा संदेश



(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक योग दिनाचे औचित्य साधून भारतीय जनता युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्ह्याच्या वतीने चलो प्रबळगड-कलावंतीण सुळका ट्रेक या विशेष साहसी आणि आरोग्यदायी उपक्रमाचे आयोजन रविवारी (दि.२१) करण्यात आले. निसर्गरम्य वातावरणात झालेल्या या उपक्रमात भाजपचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांनी सहभागी होत माची येथे युवकांसमवेत योगसाधना केली. योग, साहस आणि निसर्ग यांचा सुंदर संगम साधणाऱ्या या उपक्रमाला युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

प्रबळगड आणि कलावंतीण सुळका रायगड जिल्ह्यातील ऐतिहासिक व पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचे स्थळ मानले जातात. या ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या ट्रेकमध्ये सहभागी युवकांनी पहाटेच्या प्रसन्न वातावरणात ट्रेकचा आनंद घेतला.

ट्रेकदरम्यान विविध योगासने व प्राणायामाचे सत्र घेण्यात आले. यामुळे उपस्थितांना शारीरिक तंदुरूस्तीबरोबरच मानसिक स्वास्थ्याचे महत्त्वही पटले. **(पान २ वर..)**

# उलवे येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

## नगरसेवक परेश ठाकूर यांची उपस्थिती



(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

**उलवे नोड :** शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी महत्त्वाचा असलेला आंतरराष्ट्रीय योग दिन उलवे येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये रविवारी (दि.२१) उत्साहपूर्ण वातावरणात साजरा झाला. यावेळी पनवेल महापालिकेचे नगरसेवक परेश ठाकूर यांनी उपस्थित राहून नागरिकांसमवेत योगासने केली व सर्वांचा उत्साह वाढवला.

रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या वतीने आयोजित या विशेष कार्यक्रमात योगगुरू करुणा तावडे यांनी उपस्थितांना विविध योगासने आणि प्राणायामाचे प्रकार शिकवत निरोगी जीवनासाठी योगाचे महत्त्व विषद केले. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक स्वास्थ्यही उत्तम राहते, असे त्यांनी सांगितले. **(पान २ वर..)**

## निवडक

### तामिळनाडूमध्ये वायूगळतीमुळे सात जणांचा मृत्यू, अनेक बाधित

**तिरुवल्लूर :** तामिळनाडूमधील तिरुवल्लूर जिल्ह्यातील कनिगईपैरमध्ये सेंट पीटर्स पॉल सीफूड एक्सपोर्ट्सच्या प्रकल्पात रविवारी (दि.२१) अमोनिया वायूची गळती झाली. या दुर्घटनेत सात जणांचा मृत्यू झाला असून ६०हून अधिक जण बाधित झाले आहेत. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या वायूगळतीमुळे बाधित झालेल्या कामगारांमध्ये उत्तर भारताच्या विविध राज्यांतील स्थलांतरितांचा समावेश आहे.

### ठरलं! खासदार ओमराजे निंबाळकर शिंदेंना साथ देणार

**धाराशिव :** मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या ऑपरेशन टायगरच्या चर्चेला रविवारी (दि.२१) मूर्त स्वरूप मिळाले. ठाकरे सेनेचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी सायंकाळी मतदारसंघातील कार्यकर्त्यांशी संवाद साधून शिंदे सेनेत जाण्याचा निर्णय जाहीर केला. केवळ मी निवडून येणे महत्त्वाचे नाही, तर तुम्ही कार्यकर्त्यांनीही निवडून येणे माझ्यासाठी महत्त्वाचे आहे. यासाठी आपण पक्षांतराचा निर्णय घेत असल्याचे त्यांनी सांगितले.

# अलिबाग समुद्रात बुडणाऱ्या पाच जणांना वाचवण्यात यश

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबागमध्ये पर्यटनासाठी आलेल्या कल्याणमधील एकाच कुटुंबातील पाच जणांना समुद्रात बुडताना येथील नगर परिषदेच्या जीवरक्षक, बीट मार्शल आणि दामिनी पथकाने वाचवले. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली.

कल्याणमधील एक कुटुंब पर्यटनासाठी रविवारी (दि. २१) अलिबाग येथे पर्यटनासाठी आले होते. समुद्रकिनाऱ्यावर फिरत असताना पाच मुले पाण्यात उतरली, पण ही मुले समुद्रात वाहत जाऊ लागली. हे लक्षात येताच किनाऱ्यावर उपस्थित असलेल्या नागरिकांनी आरडाओरड करून मदतीची हाक दिली.

घटनेची माहिती मिळताच अलिबाग नगर परिषदेच्या जीवरक्षक पथकाने समुद्रात धाव घेतली. त्यांना बीट मार्शल व दामिनी पथकानेही मदत केली. बुडणाऱ्या पाच जणांना सुरक्षितपणे किनाऱ्यावर आणण्यात यश आले.

सर्व मुले सुखरूप असल्याने त्यांच्या कुटुंबीयांनी सुटकेचा निःश्वास सोडला. आपल्या मुलांचे प्राण वाचवल्याबद्दल त्यांनी जीवरक्षक, बीट मार्शल आणि दामिनी पथकाचे आभार मानले.

दरम्यान, समुद्रकिनारी येणाऱ्या पर्यटकांनी सुरक्षा नियमांचे पालन करावे, जीवरक्षकांनी केलेल्या सूचना पाळाव्यात, धोकादायक भागात जाणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.



# पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात देशाचा सर्वच क्षेत्रांमध्ये विकास –आमदार संजय केळकर

## पनवेलमध्ये विकसित भारत संकल्प संमेलन

**कळंबोली : बातमीदार**

देशात २०१४पूर्वी घोटाळ्यांची मालिका आणि विविध आरोपांनी ग्रासलेले राज्यकर्ते पाहायला मिळत होते, परंतु नरेंद्र मोदी देशाच्या पंतप्रधानपदी विराजमान झाल्यानंतर चित्र बदलून गेल्या १२ वर्षांत देशाचा सर्वच क्षेत्रांत अभूतपूर्व विकास झाला आहे. वर्षाचे ३६५ दिवस एकही दिवस रजा न घेता अहोरात्र देशवासीयांच्या सेवेत व्यस्त असणारे पंतप्रधान मोदी हे भारताला लाभलेले एक महान नेतृत्व आहे, असे गौरवोद्गार ठाणे विधानसभेचे भाजप आमदार संजय केळकर यांनी पनवेल येथे काढले.





देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या कार्यकाळाची १२ वर्षे यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल भाजप उत्तर रायगड जिल्ह्याच्या वतीने पनवेलमधील श्रीकृपा हॉल येथे शनिवारी (दि.२०) सायंकाळी विकसित भारत संकल्प संमेलन आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी आमदार केळकर बोलत होते.

या संमेलनाला भाजपचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस दीपक बेहेरे, प्रल्हाद केणी, पनवेलचे महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, नगरसेवक एकनाथ गायकवाड, मनोज भुजबळ, दशरथ म्हात्रे, नगरसेविका सीताताई पाटील, दर्शना भोईर, राजश्री वावेकर, मोनिका महानवर, प्रीती जॉर्ज, सरस्वती काथारा, विजयश्री पाटील, कुसुम पाटील, प्रियांका कांडपिळे, ॲड. शिवानी घरत, माजी नगरसेविका नीता माळी, पदवीधर प्रकोष्ठचे राज्य संघटक धनराज विसपुते यांच्यासह भाजप उत्तर रायगड जिल्हा कार्यकारिणी सदस्य, आजी-माजी नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. **(पान २ वर..)**

# चक दे इंडिया! भारतीय महिला हॉकी संघाने नेशन्स कप जिंकला

**ऑकलंड : वृत्तसंस्था**



भारतीय महिला हॉकी संघाने चार वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर एफआयएच नेशन्स कपचे जेतेपद पटकावले आहे. २०२२मधील पहिल्या हंगामात चॅम्पियन बनल्यानंतर आता २०२६मध्ये भारतीय संघाने यजमान न्यूझीलंडला अंतिम सामन्यात २-०ने पराभूत करत विजेतेपदावर आपले नाव कोरले.

भारताने सामन्याच्या पहिल्या क्वार्टरमध्येच आघाडी घेतली होती. नवनीत कौरने चौथ्या मिनिटाला गोल डागला. यानंतर सुनेलिता टोप्पो हिने १५व्या मिनिटाला गोल करत संघाला निर्णायक आघाडी मिळवून दिली.

या ऐतिहासिक विजयासोबतच भारतीय महिला संघ एफआईएच हॉकी प्रो लीग २०२६-२७साठीही पात्र ठरला आहे. ही स्पर्धा २०२८मध्ये होणाऱ्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिकसाठी पात्रता फेरी असणार आहे. त्या दृष्टीने टीम इंडियासाठी हा विजय अत्यंत महत्त्वाचा आणि मोलाचा मानला जात आहे.

विशेष म्हणजे भारतीय महिला हॉकी संघाने या संपूर्ण स्पर्धेत एकही सामना न गमावता जेतेपद पटकावले आहे. भारताने या स्पर्धेची सुरुवात अमेरिकेविरुद्धच्या ३-२ अशा विजयाने केली होती. यानंतर जपान आणि उरुग्वेचा पराभव करत संघाने उपांत्य फेरीत जागा मिळवली, तर उपांत्य फेरीत चिलीचा ६-० असा धुव्वा उडवत फायनलमध्ये धडक मारली होती.

# रायगडात ३० जूनपर्यंत जलतरण तलाव बंद

**अलिबाग :** उष्ण व दमट हवामान, मान्सूनच्या आगमनास झालेला विलंब, कमी पर्जन्यमान आणि उपलब्ध जलसाठ्यातील घट लक्षात घेता रायगड जिल्ह्यातील सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांवर अवलंबून असलेले सर्व जलतरण तलाव (स्विमिंग पूल) ३० जूनपर्यंत बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष किशन जावळे यांनी जारी केले आहेत.

एल-निनोच्या संभाव्य प्रभावामुळे अद्याप मान्सून जिल्ह्यात पूर्णपणे दाखल झालेला नसून उष्णतेच्या लाटेचा परिणाम जाणवत आहे. पाटबंधारे विभागाच्या माहितीनुसार जिल्ह्यातील २८ लघुप्रकल्पांमध्ये सरासरी केवळ १७.८९ टक्के, तर हेटवणे मध्यम प्रकल्पामध्ये २७.३१ टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. महावेध पोर्टलवरील अहवालानुसार २० जूनपर्यंत जिल्ह्यात केवळ दोन टक्के पावसाची नोंद झाली आहे. पिण्याच्या पाण्याचा पुरवठा अबाधित ठेवण्यासाठी स्विमिंग पूल बंद ठेवणे, पाणीपुरवठ्यात आवश्यक ती कपात करणे, पाण्याचा अपव्यय रोखणे व अनधिकृत पाणीवापर थांबविणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी आदेशात म्हटले आहे.

**उलवे नोड : येथील से.९मधील भगवती इम्पेरिया हौसिंग सोसायटीत बसविण्यात आलेल्या सोलार प्लांटचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते रविवारी करण्यात आले. यावेळी सिडको अधिकारी प्रमोद पाटील, सोसायटीचे चेअरमन गयाधर बेहेरा, सेक्रेटरी कुमार गौरव शील, खजिनदार अरुण पवार, सोलारचे काम करणारे कमिटी सदस्य सारंग पंडित, कन्हैय्या कुमार, आव्हाड तसेच आदेश ठाकूर व अन्य मान्यवर उपस्थित होते.**





# योग करा अन् निरोगी राहा!

### योग दिन कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

बदलत्या लाईफस्टाईलमुळे विविध आजारांचे प्रमाण वाढत असून, त्यापासून बचाव करण्यासाठी योग हा अत्यंत प्रभावी आणि रामबाण उपाय असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. नियमित योगाभ्यास केल्यास जीवनशैलीशी संबंधित आजारांपासून दूर राहता येते, असे त्यांनी सांगितले. जुहू बीच येथील फूड कोर्टजवळ आयोजित करण्यात आलेल्या १२ व्या आंतरराष्ट्रीय (जागतिक) योग दिन कार्यक्रमात ते बोलत होते.




यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, खासदार रवींद्र वायकर, आमदार अमित साटम, शिवप्रकाश, केशव उपाध्ये, पवन त्रिपाठी, दीप्ती वायकर, उषा बेन यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सातत्याने योग करणारी व्यक्ती कोणत्याही मानसिक परिस्थितीत आलेल्या आव्हानांचा यशस्वीपणे सामना करू शकते. योगामुळे शरीर निरोगी राहण्यासोबतच मन प्रसन्न आणि स्थिर राहते. त्यामुळे योग विद्येचा अधिकाधिक प्रचार आणि प्रसार होणे आवश्यक आहे. ते पुढे म्हणाले की, भारताने संयुक्त राष्ट्र संघात २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला होता. संयुक्त राष्ट्रांच्या इतिहासात अत्यंत कमी कालावधीत आणि कोणत्याही विरोधाशिवाय मंजूर झालेल्या प्रस्तावांपैकी हा एक महत्त्वाचा प्रस्ताव ठरला. आज भारताच्या पुढाकारामुळे जगभर योगाचा प्रसार झाला असून, शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी योगाचे महत्त्व संपूर्ण जगाने मान्य केले आहे.

योग ही केवळ शारीरिक व्यायाम पद्धती नसून मन, आत्मा आणि शरीर यांचा समतोल साधणारी विद्या असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. माणसाचे मन आणि निसर्ग यांचा जवळचा संबंध असून, योगाद्वारे हा संबंध अधिक दृढ होतो. नियमित योगाभ्यासामुळे शरीर तंदुरुस्त राहतेच शिवाय मानसिकदृष्ट्याही व्यक्ती सक्षम बनते, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमादरम्यान शिवप्रकाश यांनीही विचार व्यक्त केले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी विविध योगासनांचे प्रात्यक्षिक करून उपस्थितांना योगाचे महत्त्व पटवून दिले. मोठ्या संख्येने योगशिक्षक व नागरिक उपस्थित होते.

## नवी मुंबई विमानतळावरून पहिले आंतरराष्ट्रीय उड्डाण अबुधाबीसाठी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून पहिले देशाबाहेरील उड्डाण १५ जुलै रोजी पहाटे अबुधाबीसाठी होणार असून त्यासाठीची तिकिटविक्री सुरू झाली आहे. एअर इंडिया एक्स्प्रेसच्या या नॉनस्टॉप उड्डाणामुळे नवी मुंबई विमानतळाच्या आंतरराष्ट्रीय सेवेला प्रत्यक्ष प्रारंभ होणार आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून २५ डिसेंबर रोजी देशांतर्गत विमानसेवा सुरू झाली होती. त्यानंतर आंतरराष्ट्रीय उड्डाणांच्या प्रतीक्षेला आता पूर्णविराम मिळणार आहे. एअर इंडिया एक्स्प्रेसचे पहिले आंतरराष्ट्रीय विमान १५ जुलै रोजी मध्यरात्री २.५५ वाजता नवी मुंबई विमानतळावरून उड्डाण करेल. हे विमान पहाटे ४.३५ वाजता अबुधाबी येथे पोहचेल. या नॉनस्टॉप प्रवासाचा कालावधी तीन तास दहा मिनिटांचा असेल.

### १५ जुलैला पहिली फ्लाईट

अबुधाबी विमानतळावरून नवी मुंबईकडे येणाऱ्या पहिल्या उड्डाणाची वेळ सकाळी पावणेसहा वाजण्याची असून १० वाजून २० मिनिटांनी हे विमान नवी मुंबईच्या विमानतळावर उतरेल. अबुधाबी प्रवासासाठी जाण्या-येण्याचे तिकीट सध्या सुमारे ३२ हजार ५५० रुपयांपासून उपलब्ध आहे.

सुरुवातीच्या काळात आठवड्यातील बुधवार, शुक्रवार आणि शनिवार अशी तीन दिवस ही विमानसेवा असणार आहे. प्रवाशांची मागणी पाहता भविष्यात यामध्ये वाढ करण्याचे विमान कंपन्यांचे नियोजन आहे.



## पनवेलमध्ये अतिक्रमणपूर्व दक्षता समिती स्थापन करण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिका हद्दीत अतिक्रमण तोडण्यापेक्षा 'होऊ न देणे' या पद्धतीची प्रभावी अंमलबजावणी करावी. यासाठी ज्या प्रभागात अतिक्रमण होत असेल त्या प्रभागातील नगरसेवकांना जबाबदार धरून त्यांचे नगरसेवक पद कायद्याने रद्द करावे, अशी मागणी नगरपरिषदेचे माजी नगरसेवक व शिवसेना रायगड जिल्हा कार्यकारिणी सल्लागार रमेश गुडेकर यांनी आयुक्त मंगेश चितळे व महापौर नितीन पाटील यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.




निवेदनात गुडेकर यांनी म्हटले आहे की, पनवेलचा विकास होत आहे, रस्ते रुंद होत आहेत, हे वैभवाचे लक्षण आहे. मात्र या विकास प्रक्रियेत 'अतिक्रमण हटाव मोहीम' हे विदारक दृश्य नेहमी पाहायला मिळते. जेसीबीचा पंजा कच्च्या घरावर पडतो तेव्हा फक्त दगड-विटा नाही तर सामान्य माणसांचा संसार आणि स्वप्ने उद्ध्वस्त होतात. तोडताना होणारे नुकसान केवळ आर्थिक नसते, तर ते भावनिक असते. त्यासाठी 'अतिक्रमणपूर्व दक्षता समिती' स्थापन करणे काळाची गरज आहे.

मनपाने केवळ 'अतिक्रमण विभाग' न ठेवता 'अतिक्रमणपूर्व दक्षता समिती' स्थापन करावी. याचे काम शहराच्या प्रत्येक कोपऱ्यावर नजर ठेवणे असेल. जिथे अतिक्रमण सुरू होत आहे, तिथेच सुरुवातीला प्रतिबंध घालावा. गरिबांना उघड्यावर आणू नका. ज्यांना हॉकर्स झोनमध्ये जागा देणे हक्काचे आहे त्यांना हक्काची जागा उपलब्ध करून द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

### कामोठ्यात मंगळसूत्र लांबवले

**पनवेल : कामोठे** वसाहतीतील अजिंक्यतारा सोसायटी, सेक्टर ७ येथे एका महिलेच्या गळ्यातील आठ ग्रॅम सोन्याचे मंगळसूत्र काळ्या रंगाच्या स्कुटीवरून आलेल्या दोन अनोळखी इसमांनी खेचून पळ काढल्याची घटना घडली आहे. यातील एका इसमाने महिलेसोबत सोसायटीमध्ये प्रवेश करून पाठीमागून मंगळसूत्र खेचले. मंगळसूत्र खेचणाऱ्याने पांढरा टी-शर्ट व काळी पॅन्ट घातली होती, तर स्कुटीवर मागे बसलेल्या इसमाने पांढरा फुल शर्ट व काळी पॅन्ट घातली होती.

### मोरबेच्या मुख्य जलवाहिनीतून लाखो लिटर पाण्याची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

वाढत्या पाणीटंचाईच्या काळात मोरबे धरणातून नवी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिनीला अनधिकृत जोडणी करून लाखो लिटर पाणी चोरी केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नवी मुंबई महापालिकेने पाणीचोरी रोखण्यासाठी विशेष पथके तैनात केली आहेत. तपासणीत पनवेलमधील विचुंबे आणि देवद गाव हद्दीत एक्सप्रेस-वेच्या बाजूला असलेल्या मुख्य जलवाहिनीचे वॉशआऊट व्हॉल्व्ह तोडून अनधिकृत नळजोडणी करून पाणी चोरी केल्याचे निदर्शनास आले. या जलवाहिनीवरून तब्बल ३९,८९,५८० रुपये किमतीच्या ३,३२,४६५ घनमीटर पाण्याची चोरी करण्यात आली आहे.

या अनधिकृत जोडणीमुळे नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होऊ शकतो. महापालिका पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी संतोष उनवणे यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या गुन्ह्यात निया फॅब्रिकेटर्सचे साई भिंगाडे, अल्ताफ शेख, एक अज्ञात व्यक्ती आणि काँक्रिट मिक्सर गाडीचा समावेश असल्याचे आढळून आले आहे.

## खारघरमध्ये आठ लाखांचे कोकेन, एमडी जप्त

**पनवेल : वार्ताहर**

खारघर परिसरात अमली पदार्थांची अवैध विक्री करण्यासाठी आलेल्या नायजेरियन नागरिकाला अमली पदार्थ विरोधी पथकाने रंगेहाथ अटक केली. या कारवाईत पोलिसांनी आठ लाख १९ हजार रुपये किमतीचे कोकेन आणि मेफेड्रॉन जप्त केले आहे. खारघर सेक्टर-३६ मधील अमनदुत मेट्रो रेल्वे स्टेशनच्या बाजूच्या सर्विस रोडवर अमली पदार्थांची विक्री करण्यासाठी परदेशी नागरिक येणार असल्याची माहिती मिळाल्यावर पथकाने सापळा रचला.

यावेळी उमुन्ना अँडयुब्युसी विल्याम्स (४६) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे ३.९९ लाखांचे १३.३ ग्रॅम मेफेड्रॉन आणि ४.२० लाखांचे ८.४ ग्रॅम कोकेन आढळले. प्राथमिक चौकशीत डोंबिवली येथे राहणारा इव्हलस चिमेझी या नायजेरियन नागरिकाने हा साठा विक्रीसाठी दिल्याचे समोर आले आहे. पोलीस त्याचा शोध घेत आहेत. खारघर पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल असून पुढील तपास सुरू आहे.

## आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



**पनवेल : वार्ताहर**

भानुबाई वाडी, रायगड प्राईम एज्युकेशन हेल्थ लर्निंग सर्व्हिसेस (PEHL) या संस्थेच्या वतीने आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी आणि त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने भानुबाई वाडी येथे शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमासाठी व्ही. एल. कृष्णन आणि त्यांची कन्या ॲड. गायत्री कृष्णन यांनी मदत केली. त्यांच्या सहकार्यामुळे रायगड जिल्हा परिषद शाळा, भानुबाई वाडी येथे इयत्ता पहिली ते पाचवीमध्ये शिक्षण घेणाऱ्या ३५ आदिवासी विद्यार्थ्यांना संपूर्ण शैक्षणिक वर्षासाठी आवश्यक असणारे शैक्षणिक साहित्य मोफत वितरित करण्यात आले. यावेळी कृष्णन यांनी विद्यार्थ्यांना आशीर्वाद देऊन त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

ॲड. गायत्री कृष्णन यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत मन लावून अभ्यास करण्यासाठी आणि जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रेरित केले. या उपक्रमाबद्दल विद्यार्थ्यांनी व त्यांच्या पालकांनी आनंद व्यक्त करून आयोजक व प्रायोजकांचे मनःपूर्वक आभार मानले.

या कार्यक्रमास पहल संस्थेचे समन्वयक मधुकर पुजारी, रत्नाकर घरत तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक उपस्थित होते. स्थानिक नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक केले आणि आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले.



### मुलीवर लैंगिक अत्याचार करणारा गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

पोटच्या १६ वर्षांच्या मुलीवर तब्बल १० वर्षे सातत्याने लैंगिक अत्याचार करणाऱ्या ५५ वर्षीय नराधम पित्याला खांदेश्वर पोलिसांनी अटक केली आहे. नवीन पनवेल परिसरात घडलेल्या या माणुसकीला काळीमा फासणाऱ्या घटनेमुळे परिसरात संताप व्यक्त होत आहे. पीडित मुलगी २०१६मध्ये सात वर्षांची असल्यापासून हा छळ सुरू होता. आरोपी आईच्या अनुपस्थितीत तिला अश्लील कृत्य करण्यास भाग पाडत होता. विरोध केल्यास बेदम मारहाण व जीवे मारण्याच्या धमक्या देत होता.

२०२४ मध्ये मुलगी १४ वर्षांची असतानाही नराधमाने अनैसर्गिक व लैंगिक अत्याचार केले. अखेर पीडितेने चाइल्ड लाइन हेल्पलाइनवर संपर्क साधून मदतीची याचना केली. चाइल्ड लाइनच्या कार्यकर्त्यांनी तिला खांदेश्वर पोलीस ठाण्यात आणले. पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली असून न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

## धनगर समाज संस्थेकडून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप

**खोपोली : प्रतिनिधी**

हर हर चांगभले धनगर समाज संस्था रायगड यांच्या वतीने दहावी बारावीत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केले, तर समाजातील राजकीय क्षेत्रात निवडून आलेले पदाधिकारी पोलीस झालेल्या समाज बांधवांचा सत्कार समारंभ पार पडला, हर हर चांगभले धनगर समाज संस्था ही गेल्या अनेक वर्षांपासून धनगर समाजाच्या अडीअडचणी जाणून घेत त्या सोडवून समाजाला न्याय देण्यासाठी अहोरात्र काम करत असते, त्याच उद्देशाने समाजतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करून गुणगौरवही करत असते त्याच प्रमाणे यावर्षीही या सत्कार सोहळा आयोजित केला होता या सत्कार सोहळा आज खालापूर येथील आदिवासी भवन कार्यालयात पार पडला,



यावेळी हर हर चांगभले धनगर समाज संस्थेच्या रायगड जिल्हा महिला आघाडी अध्यक्षापदी माजी नगरसेविका सुनीता संतोष आखाडे यांची निवड करण्यात आली तर खालापूर तालुका अध्यक्षपदी ठकुराम झोरे,तर कर्जत तालुका अध्यक्षपदी प्रवीण बावदाने यांची निवड करण्यात आली त्यांना निवडीचे पत्र प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आले तर यावेळी दहावी बारावीत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत ६० विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना पारितोषिक प्रमाणपत्र आणि शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले यावेळी हर हर चांगभले धनगर संस्थेचे रायगड जिल्हाध्यक्ष अनंता हिरवे, कार्याध्यक्ष अँड संतोष आखाडे, कार्याध्यक्ष विठ्ठल आखाडे, कार्याध्यक्ष सावळाराम कोकरे, सहउपाध्यक्ष अँड गणेश आखाडे, सचिव संपत ढेबे, युवा उपाध्यक्ष रवींद्र बोडेकर, खजिनदार रामदास कोकरे, सहखजिनदार नारायण बोडेकर, संघटक नथुराम ढेबे, युवा अध्यक्ष हरेशभाई ढेबे सदस्य बबन हिरवे, भागू बोडेकर, लक्ष्मण मरगळे, सुनीता आखाडे, धोंडू बोडेकर, श्रीसंत बाळू मामा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष तथा माजी आदर्श सरपंच बबन खरात, कायदेशीर सल्लागार अँड अभिमान हाके पाटील, पीआय अर्चना हाके पाटील, प्राध्यापक डॉ संगीता चित्रकोटी, रासप कोकण प्रदेशाध्यक्ष भगवान ढेबे आदी उपस्थित होते.

## बांधकाम सुरू असताना मजुराचा मृत्यू

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील वावंजे परिसरात बांधकामाचे काम करीत असताना एका अनोळखी मजुराला चक्कर येऊन त्याचा प्राथमिक आरोग्य केंद्र वावंजे येथे आकस्मिक मृत्यू झाला. पनवेल तालुका पोलीस त्याच्या नातेवाइकांचा शोध घेत आहेत. मयताची उंची पाच फूट, रंग गोरा, अंगात निळा फूल शर्ट, चॉकलेटी काग्रो हाफ पॅन्ट असून दाढी-केस वाढलेले आहेत. या इसमाबाबत कोणाला माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा सहा. पो. नि. सुभाष डिगे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पान १ वरुन

### जागतिक योग दिनानिमित्त प्रबळगड माची येथे योगसाधना

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी युवकांशी संवाद साधताना सांगितले की, योग ही भारताने जगाला दिलेली अमूल्य देणगी आहे. निरोगी शरीर, सुदृढ मन आणि सकारात्मक विचारसरणी घडविण्यासाठी योगसाधना अत्यंत उपयुक्त आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात युवकांनी नियमित योगसाधना आणि व्यायामाला प्राधान्य देणे गरजेचे आहे. निरोगी आणि सक्षम युवा शक्ती ही विकसित भारताच्या निर्मितीसाठी अत्यंत आवश्यक असून युवकांनी आरोग्यदायी जीवनशैलीचा स्वीकार करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने आयोजित या उपक्रमामागील उद्देश युवकांमध्ये आरोग्य, फिटनेस, पर्यावरण संवर्धन आणि साहसी उपक्रमांविषयी जागरूकता निर्माण करणे हा होता. निसर्गाच्या सानिध्यात केलेल्या योगसाधनेमुळे सहभागी युवकांमध्ये उत्साह, सकारात्मक ऊर्जा आणि आत्मविश्वास निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

या उपक्रमात सरपंच बाळू भूतांबरा, राम भवर, ग्रामपंचायत सदस्य सतीश पाटील, दिनेश पाटील, भाजप पनवेल शहराध्यक्ष तथा नगरसेवक सुमित झुंजारराव, भाजयुमो उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, मयूर कदम, हिमेश बहिरा, अनिमेश ओझे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि मोठ्या संख्येने युवक उपस्थित होते. या उपक्रमाने युवकांना आरोग्य, शिस्त, साहस आणि निसर्गप्रेम यांचा संदेश देत एक संस्मरणीय अनुभव प्रदान केला.

### उलवे येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

या भव्य कार्यक्रमाला उलवे व परिसरातील शेकडो नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पहाटेपासूनच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून सामूहिक योगाभ्यासात सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गौरव आर्ट्स, मी एअरकूल आणि विशाल डेकोरेटर्स यांनी टायटल स्पॉन्सर्स म्हणून महत्त्वपूर्ण योगदान दिले.

योगाभ्यासामुळे निर्माण झालेली सकारात्मक ऊर्जा आणि उत्साहामुळे संपूर्ण क्रीडा संकुल परिसर आनंदमय व आरोग्यदायी वातावरणाने भारावून गेला होता. या उपक्रमातून नागरिकांमध्ये योगाविषयी जागरूकता निर्माण होऊन निरोगी जीवनशैलीचा संदेश प्रभावीपणे पोहचल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.


### पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात देशाचा सर्वच क्षेत्रांमध्ये विकास - आमदार संजय केळकर

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आमदार संजय केळकर यांनी २०१४ ते २०२६ या १२ वर्षांच्या कालावधीतील सशक्त, समृद्ध आणि सुरक्षित भारताच्या प्रगतीचा व विकासाचा विस्तृत आढावा मांडला. मोदी सरकारच्या काळात शिक्षण, आरोग्य, कला, क्रीडा, उद्योग, पायाभूत सुविधा आणि विविध सार्वजनिक उपक्रमांमध्ये देशाने विकासात्मक गगनभरारी घेतल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

या कार्यक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे समाज उभारणीत मोलाचे योगदान देणाऱ्या विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित नागरिकांना येथे आमंत्रित करण्यात आले होते. यामध्ये शिक्षण, आरोग्य, सामाजिक, सांस्कृतिक, कलाक्षेत्र, वारकरी संप्रदाय, विविध धार्मिक मंडळांचे पदाधिकारी तसेच डॉक्टर, वकील आणि पत्रकारांचा समावेश होता. त्यांचा भाजपच्या वतीने यथोचित सन्मान व सत्कार करण्यात आला.

### दुखवटा

#### बाळाराम राऊत



**मोहोपाडा :** मोहोपाडा येथील बाळाराम मारुती राऊत यांचे वयाच्या ७९व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर मोहोपाडा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. मोहोपाडा गावात कोणताही गावकीचा विषय असल्यास तंटा सोडविण्यासाठी ते नेहमीच सक्रिय असायचे.

## संपादकीय

# आत्मनिर्भर संरक्षणाची नवी झेप

नागपूरच्या अंबाझरी येथील यंत्र इंडिया लिमिटेडच्या आयुध निर्माणी परिसरात काही दिवसांपूर्वी केंद्रीय संरक्षणमंत्री यांच्या हस्ते अत्याधुनिक १० हजार टन क्षमतेच्या ॲल्युमिनियम एक्सट्रूजन प्रेस प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले. देशाच्या सुरक्षेशी संबंधित अत्यावश्यक गरजांवर भारताचे स्वतःचे नियंत्रण असणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन यावेळी करण्यात आले. जागतिक अस्थिरता, बदलते सामरिक समीकरण आणि संरक्षण क्षेत्रातील तांत्रिक स्पर्धा यांच्या पार्श्वभूमीवर हा प्रकल्प केवळ औद्योगिक गुंतवणूक नसून भारताच्या संरक्षण आत्मनिर्भरतेच्या नव्या पर्वाची नांदी ठरत आहे.

**भारताच्या स्वातंत्र्योत्तर इतिहासात संरक्षण क्षेत्रातील मोठा भाग दीर्घकाळ आयातीवर अवलंबून राहिला. आधुनिक लढाऊ विमाने, तोफा, क्षेपणास्त्रांचे घटक, दळणवळण उपकरणे आणि विविध संरक्षण साहित्य यासाठी परदेशी कंपन्यांवर अवलंबून राहावे लागत होते. यामुळे प्रचंड आर्थिक खर्च तर होतच होता, पण संकटकाळात पुरवठा खंडित होण्याचाही धोका कायम होता. आजच्या भू-राजकीय परिस्थितीत हा धोका अधिक गंभीर बनला आहे. त्यामुळे संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरता हा पर्याय नसून राष्ट्रीय सुरक्षेची अपरिहार्यता बनली आहे. गेल्या काही वर्षांत केंद्र सरकारने आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडिया या उपक्रमांतर्गत संरक्षण क्षेत्राला विशेष प्राधान्य दिले आहे. संरक्षण उत्पादनातील स्वदेशीकरण वाढविणे, आयातबंदी यादी जाहीर करणे, संशोधन-विकासासाठी गुंतवणूक वाढविणे अशा विविध उपाययोजनांमुळे या क्षेत्रात सकारात्मक बदल दिसून येत आहेत. भारताची संरक्षण निर्यात सातत्याने वाढत असून अनेक देश भारतीय बनावटीच्या संरक्षण साहित्याकडे विश्वासाने पाहू लागले आहेत. नागपूर येथे उभारला जाणारा ॲल्युमिनियम एक्सट्रूजन प्रेस प्रकल्प या व्यापक धोरणाचा महत्त्वाचा भाग आहे. संरक्षण आणि एरोस्पेस क्षेत्रासाठी लागणारे उच्च दर्जाचे ॲल्युमिनियम घटक तयार करण्याची क्षमता या प्रकल्पामुळे देशात निर्माण होणार आहे. युद्धसामग्री, क्षेपणास्त्रे, विमानांचे भाग, नौदल उपकरणे आणि विशेष संरक्षण प्रणालींसाठी लागणाऱ्या अनेक महत्त्वाच्या घटकांची निर्मिती आता स्वदेशात होऊ शकेल. त्यामुळे आयातीवरील अवलंबित्व कमी होईल आणि संरक्षण उत्पादन साखळी अधिक सक्षम बनेल. संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरतेचे महत्त्व केवळ आर्थिक दृष्टिकोनातून पाहता येणार नाही. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीनेही त्याला तितकेच महत्त्व आहे. रशिया-युक्रेन संघर्षानंतर जगभरातील अनेक देशांना पुरवठा साखळीतील अडचणींचा सामना करावा लागला. या अनुभवातून प्रत्येक राष्ट्राने आपल्या संरक्षण गरजांसाठी स्वदेशी क्षमतेचा विकास करणे किती आवश्यक आहे हे अधोरेखित झाले. भारतातील संरक्षण उद्योग आज नव्या टप्प्यात प्रवेश करत आहे. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांसोबतच खासगी कंपन्याही या क्षेत्रात मोठी भूमिका बजावत आहेत. ड्रोन तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा, आधुनिक शस्त्रप्रणाली आणि संरक्षण इलेक्ट्रॉनिक्स यांसारख्या क्षेत्रांत भारतीय उद्योग झपाट्याने प्रगती करत आहेत. यामुळे केवळ संरक्षण सज्जतेत वाढ होत नाही, तर देशातील तंत्रज्ञान विकासालाही चालना मिळते. यंत्र इंडिया लिमिटेडसारख्या संस्थांची भूमिका यामध्ये विशेष महत्त्वाची आहे. आयुध निर्माणींच्या पुनर्रचनेनंतर निर्माण झालेल्या या संस्थेने संरक्षण उत्पादन क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यास सुरुवात केली आहे. नागपूरमधील हा प्रकल्प त्याच बदलत्या दृष्टिकोनाचे प्रतीक आहे. जागतिक दर्जाच्या उत्पादन सुविधा, अत्याधुनिक यंत्रसामग्री आणि उच्च गुणवत्तेच्या उत्पादनांमुळे भारताची संरक्षण उत्पादन क्षमता अधिक मजबूत होणार आहे.**

# एल निनोची चाहूल-पाणी अडवण्याची जबाबदारी

एल निनो ही फक्त हवामानाची घटना नाही, ती मानवी समाजाची सत्वपरीक्षा आहे. शास्त्रज्ञांनी यंदा 'सुपर एल निनो'चा इशारा दिला आहे. त्यामुळे मान्सून लांबणे, पावसाचे अनिश्चित चक्र, दुष्काळाची टांगती तलवार हे चित्र समोर येत आहे, पण भीतीने हातपाय गाळून चालणार नाही. एल निनोचा इतिहास सांगतो की, ज्या समाजाने आधीच तयारी केली, पाणी अडवले, जमीन वाचवली, तोच समाज संकटातून ताठ मानेने उभा राहिला. म्हणूनच मृद व जलसंधारण मंत्री या नात्याने महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकरी, प्रत्येक गावाला आवाहन आहे की, आता पाणी अडवण्याची तयारी करावी.

निसर्गाचा इशारा

एल निनो हा पृथ्वीच्या नैसर्गिक हवामानचक्राचा भाग आहे. पण गेल्या १०० वर्षांत मानवी हस्तक्षेपामुळे त्याची तीव्रता वाढली आहे. वृक्षतोड, जमिनीचा ऱ्हास, भूजलाचा बेसुमार उपसा आदी कारणांमुळे निसर्गाचा समतोल बिघडला आहे. परिणामी एकीकडे महापूर, दुसरीकडे तीव्र दुष्काळ. हा इतिहास आपल्याला शिकवतो की, एल निनोच्या काळात जलसंधारण नसेल तर मानवाला मोठी किंमत मोजावी लागते.

माझ्या मते चिंता करण्याऐवजी आपण कृती करूया. मृद व जलसंधारण विभागाने 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' मोहीम हाती घेतली आहे. कारण एल निनोच्या वर्षात पाऊस कमी पडला तरी, पडलेला प्रत्येक थेंब जर आपण अडवला, तर दुष्काळ टाळू शकतो. शेतकऱ्यांसाठी एल निनो काळातील चार मंत्र

१. पाणी अडवा, पाणी जिरवा: बांधबंदिस्ती, सीसीटी, नाल्यांचे खोलीकरण ही कामे युद्धपातळीवर करावी. पडलेल्या पावसाचा थेंब अन थेंब वाहून जाऊ न देता तो जमिनीत मुरला पाहिजे.

२. गाळ म्हणजे सोने: धरणे, तलाव आणि बंधाऱ्यातील गाळ काढून तो शेतात टाका. एल निनोच्या वर्षात हा गाळ ओलावा धरून ठेवतो आणि उत्पादन वाढवतो. तसेच धरणातील गाळ निघाल्याने पाणी साठवण क्षमता ३० टक्याने वाढते.

३. पीक पद्धती बदला: एल निनोच्या वर्षात जास्त पाणी लागणारी पिक पद्धती घेणे टाळावे. कमी पाण्यात येणारी, कमी कालावधीची पिके, डाळी, तेलबिया यांना प्राधान्य द्यावे. हवामान खात्याचा अंदाज घेऊन पेरणी करावी.

४. झाडे लावा, जीवन वाचवा: वृक्षतोड ही एल निनोची तीव्रता वाढवते. प्रत्येक शेतकऱ्याने शेताच्या बांधावर, शेताच्या कडेने किमान १० झाडे लावावी.

शासन खंबीरपणे पाठीशी

महाराष्ट्र शासनाने मृद व जलसंधारण विभागासाठी निधी वाढवला आहे. गावागावात जलसंधारणाची कामे सुरू आहेत. पण हे फक्त शासनाचे काम नाही, ही जनचळवळ आहे. 'पाणी अडवले तरच जीवन जगेल' हे सूत्र प्रत्येकाने अंगीकारले पाहिजे.

एल निनो, दुष्काळ हे सगळे जोडले गेले आहेत. पण आपला शेतकरी हा मातीचा कैवारी आहे. त्याने अनेक संकटे झेलली आहेत. म्हणून मी सांगतो की, एल निनोची भीती बाळगू नका. तयारी करा. कारण संकटापूर्वी व्यवस्थापन करणारा समाजच इतिहास घडवतो. पाऊस निसर्ग देईल, पण पाणी अडवण्याची जबाबदारी आपली आहे. चला, मिळून महाराष्ट्राला 'जलसमृद्ध महाराष्ट्र' बनवूया.

**-संजय राठोड, मृद व जलसंधारणमंत्री, महाराष्ट्र राज्य**

# पाणी वाचवा-पाणीबाणी टाळा!

यापूर्वी कधीही न अनुभवलेला उकाडा यंदा राज्यातील नागरिकांना सहन करावा लागला. तारखेनुसार पावसाळा सुरु झाला असला तरी आज जून महिना अर्धा संपला तरी पावसाचा पत्ता नाही. त्यामुळे राज्यातील नागरिकांसह पशु-पक्षीही हैराण झाले आहेत. उष्माघाताने यंदा अनेक पशु पक्षांचा बळी घेतला. काहींच्या मते यंदा राज्यात अभूतपूर्व दुष्काळ अनुभवायला मिळणार आहे. भीषण पाणीटंचाईला तोंड द्यावे लागणार आहे.

पाणी ज्याचे दुसरे नावच जीवन आहे. पाण्याविना जगणे केवळ असह्य आहे. केवळ पिण्यासाठीच नव्हे; तर कपडे धुणे, भांडी घासणे, दैनंदिन स्वच्छता यासाठी पाण्याला पर्याय नाही. पाण्याचा एकमेव स्त्रोत म्हणजे पाऊस आणि तोच लांबल्याने पाणी पुरवठ्याची सर्व गणिते कोलमडू लागली आहेत. त्यामुळे अनेक शहरी भागांत पाणी कपात सुरू आहे. काही भागांत एक दिवसाआड, तर काही भागांत आठवड्यातून एकदा पाणी पुरवले जात आहे. वाढती लोकसंख्या, शहरांत सुरू असलेली विकासकामे यामुळे उपलब्ध पाणी साठ्यावर प्रचंड ताण येत असतो.

उन्हाळा सुरु झाला की राज्य तसेच जिल्हा प्रशासनाकडून दरवर्षी पाणी वाचवण्याचे आवाहन करण्यात येते. आगामी काळात जगायचे असेल, तर आज पाण्याची बचत करणे अनिवार्य झाले आहे. बऱ्याचदा शेजारी पाजारी अन्य कोणी पाण्याची बचत करताना दिसत नाहीत, मग मीच का पाणी वाचवावे, असे विचार मनात येतात, मात्र शेजारची व्यक्ती पैशाची उधळपट्टी करते म्हणून त्याचे पाहून आपण ती करत नाही, कारण पैशाचे महत्त्व, पैसे वाचवण्याचे महत्त्व, पैसे कमावण्यासाठी लागणारी मेहनत याबाबतची जाण आपल्या प्रत्येकाला आहे. आज पाणी सहज उपलब्ध होत आहे याचा अर्थ भविष्यातही ते सहज उपलब्ध होईलच असे नाही. त्यामुळे पाण्याच्या बचतीचे महत्त्वही आपण लक्षात घ्यायला हवे.आपल्या लहान सहान कृतीतून पाण्याची बचत आपल्याला करता येते.

पाणी वाचवणे म्हणजे अस्वछ राहणे असे मुळीच नव्हे, आपल्या दैनंदिन स्वच्छतेसाठी उदा. अंघोळ, तोंड धुणे, हात धुणे आणि अन्य स्वच्छतेसाठी किती पाणी आपण व्यय करतो हे प्रत्येकाला ज्ञात असते. त्यामध्येही उन्हाळ्यात जर आपण शॉवरचा वापर करत असू, तर बादलीचा वापर करून कित्येक लिटर पाणी आपण वाचवू शकतो. हात धुताना हाताला हँडवॉश अथवा साबण लावेपर्यंत आपण नळ चालूच ठेवत असू, तर तो बंद करायला हवा. कपडे आणि भांडी धुतांनाही हाच नियम पाळूया. भांड्यांना साबण लावताना नळ बंद ठेवूया. पिण्यासाठी आवश्यक तेव्हढेच पाणी घेऊया, जेणेकरून पाणी पिऊन झाल्यानंतर पेल्यात उरलेले पाणी अन्यत्र टाकावे लागणार नाही. कपडे धुण्यासाठी आणि भांडी घासण्यासाठी शक्य असल्यास काही दिवस यंत्राचा वापर न करता हाताने धुण्याचा प्रयत्न करूया. घरातील एखादा नळ बिघाड झाल्याने त्यातून पाणी गळत असेल, तर तो तत्परतेने दुरुस्त करून घेऊया. झाडांना आवश्यक तेवढेच पाणी देऊया. एखाद्या ठिकाणी पाईपलाईनमधून पाण्याची गळती होत असेल, तर त्वरित पाणी खात्याला कळवून त्या ठिकाणी दुरुस्ती करून घेऊया. पाणी वाचवण्याचे महत्व आपल्या घरातील लहानग्यांनाही सांगूया.

आपण जर सोसायटीत राहत असू तर सोसायटीची मिटिंग घेऊन पाणी वाचवण्याचे प्रयत्न सामूहिकपणे करण्याचा प्रयत्न करूया! पाण्याला जीवन असे म्हटले जाते. फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये महागडे जेवण जेवल्यानंतरही ते पचण्यासाठी जेवणानंतर किमान ग्लासभर पाणी तरी आपल्याला हवेच असते. पाण्याविना जीवनाची आपण कल्पनाही करू शकत नाही. काही देशांमध्ये पाणीटंचाईमुळे इंधनाच्या दरात पाणी विकले जात असल्याच्या बातम्या आजवर आपण वाचल्या आहेत. आज आपण पाणी नाही वाचवले, तर भविष्यात भारतातही अशीच परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यासाठी पाणी वाचवण्याची सवय आतापासून अंगवळणी पाडूया!

ज्या प्रमाणात लोकसंख्या वाढत आहे आणि ज्या प्रमाणात पाण्याचा व्यय होत आहे ते पाहता उपलब्ध जलसाठे दरवर्षी अपुरेच पडतात. गेल्या काही वर्षांचा अंदाज घेता हवामान खाते आणि पाऊस यांचे गणित कधी जुळताना दिसत नाही त्यामुळे यंदाही पुरेसा पाऊस पडेल याची काहीच शाश्वती नाही.

नागरिकांना दरवर्षी भीषण पाणी टंचाईला तोंड द्यावे लागते. पाच-सहा किलोमीटर अंतर पायपीट करून पाणी आणावे लागते. पाण्याच्या एका थेंबासाठी दरवर्षी कितीतरी पशु-पक्ष्यांचा बळी जातो. भगवंताच्या कृपेमुळे आपल्याला पुरेसे पाणी मिळते, त्याबद्दल आपण कृतज्ञ राहूया आणि आतापासूनच पाणी बचतीची सवय स्वतःला आणि आपल्या कुटुंबाला लावून घेऊया जेणेकरून भविष्यात पाणीबाणी निर्माण झालीच, तर तिचा सामना आपल्याला समर्थपणे करता येईल!

**-जगन घाणेकर, मुंबई**



## बदलते तंत्रज्ञान

# कॉम्प्युटर, लॅपटॉपवरही करता येणार 'ग्रुप कॉलिंग'

स्मार्टफोनच्या माध्यमातून जगाला जोडणारे लोकप्रिय मेसेजिंग ॲप 'व्हॉट्सॲप'आपल्या वेब युजर्ससाठी एक नवं फिचर घेऊन येत आहे. ऑफिसमध्ये काम करताना किंवा लॅपटॉपवर व्यस्त असताना व्हॉट्सॲपवर ग्रुप कॉल आला की, अनेकदा आपल्याला मोबाईल हातात घ्यावा लागतो, पण आता ही कसरत लवकरच बंद होणार आहे. व्हॉट्सॲप आता आपल्या वेब व्हर्जनवर थेट ग्रुप कॉलिंगचे फिचर घेऊन येत आहे. या नव्या सुविधेमुळे युजर्सना मोबाईल किंवा डेस्कटॉप ॲपशिवाय थेट ब्राउझरवरूनच तब्बल ३२ जणांशी ऑडिओ किंवा व्हिडीओ कॉलवर जोडले जाता येणार आहे.



व्हॉट्सॲपच्या घडामोडींवर नजर ठेवणाऱ्या 'WABetaInfo' या प्रसिद्ध वेबसाईटने दिलेल्या माहितीनुसार सध्या हे फिचर चाचणीच्या टप्प्यात असून काही निवडक बीटा युजर्ससाठी रोलआऊट करण्यात आले आहे. या नव्या अपडेटमुळे व्हॉट्सॲप वेब आणि मोबाईल ॲपमधील अंतर आता जवळपास संपुष्टात येणार आहे.

आतापर्यंत व्हॉट्सॲप वेबवर फक्त दोन व्यक्तींमध्येच व्हॉईस किंवा व्हिडिओ कॉल करण्याची सोय होती, मात्र या नव्या अपडेटमुळे आता मोबाईल आणि डेस्कटॉप ॲपप्रमाणेच ब्राउझरवरही ग्रुप कॉलिंगचा आनंद घेता येईल.

कॉलिंग आयकॉन : हे फिचर मिळाल्यानंतर युजर्सना व्हॉट्सॲप वेबवरील ग्रुप चॅट विंडोमध्ये वरच्या बाजूला एक कॉलिंग आयकॉन दिसेल.

निवडक सदस्यांना कॉल : या आयकॉनवर क्लिक करून युजर्स व्हॉईस किंवा व्हिडिओ कॉलचा पर्याय निवडू शकतात. विशेष म्हणजे, ग्रुपमधील सर्वांना कॉल न लावता, केवळ ठराविक सदस्यांना निवडून कॉल करण्याची सोयही यात देण्यात आली आहे.

३२ लोकांची मर्यादा : मोबाईल ॲपप्रमाणेच वेब व्हर्जनवरही एकाच वेळी तब्बल ३२ जण ग्रुप कॉलमध्ये सहभागी होऊ शकतील.

ऑफिसचे काम करणाऱ्या आणि 'वर्क फ्रॉम होम' करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी हे अपडेट अत्यंत फायदेशीर ठरणार आहे. विशेषतः 'लिनक्स' ऑपरेटिंग सिस्टीम वापरणाऱ्या युजर्ससाठी, ज्यांच्याकडे व्हॉट्सॲपचे अधिकृत डेस्कटॉप ॲप नाही, त्यांना या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळेल.

# अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते बाबूराव पेंढारकर

## निमित्त



बाबूराव पेंढारकर हे मराठी चित्रपट-अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते होते. त्यांचा जन्म २२ जून १८९६ रोजी कोल्हापूर या ठिकाणी झाला. त्यांचे बालपण हे कोल्हापूरच्या शाहू महाराजांच्या जमान्यात गेले.

बाबूरावांनी चित्रमहर्षी बाबूराव पेंटर यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या 'महाराष्ट्र फिल्म कंपनी'मध्ये प्रवेश करत सैरंध्री (१९२०) या पहिल्या मूकपटात विष्णूची लहानशी भूमिका करून अभिनयाचा श्रीगणेशा केला. पुढे 'सुरेखाहरण' (१९२१), 'भक्त दामाजी'(१९२२), 'वत्सलाहरण', 'सिंहगड'(१९२३), 'कल्याण खजिना'(१९२४) अशा मूकपटांच्या निर्मितीमध्ये बाबूरावांनी आपले सक्रिय योगदान दिले.

१९२९मध्ये कोल्हापुरात नव्याने स्थापन झालेल्या प्रभात फिल्म कंपनीत बाबूराव व्यवस्थापकाच्या पदावर रुजू झाले आणि 'गोपाल कृष्ण'(१९२९),'राणी साहेबा अर्थात बजरबट्टू', 'खुनी खंजर', 'उदयकाल'(१९३०), 'जुलूम', 'चंद्रसेना'(१९३१) या मूकपटांच्या निर्मितीची बाजू त्यांनी सांभाळली. यातल्या बजरबट्टूमध्ये बाबूरावांना खलनायकाची भूमिका साकारण्याची संधी मिळाली. ती अतिशय चांगली वठली.

४५ वर्षांच्या कारकीर्दीमध्ये बाबूरावांच्या नावावर ७ मूकपट, ४९ मराठी, २१ हिंदी चित्रपट आणि ५ नाटके आहेत. ज्या काळात चित्रपट हे माध्यम भारताला फारसे परिचित नव्हते, तेव्हा कोणतीच अनुकूलता, प्रशिक्षण आणि आर्थिक पाठबळ नसताना कलानिर्मितीच्या ध्यासाने झपाटलेल्या भालजी पेंढारकर, मास्टर विनायक आणि व्ही. शांताराम यांना जोडणारा एक दुवा म्हणून बाबूराव पेंढारकर मार्गदर्शकाच्या रूपाने कार्यरत झाले. या दिग्गज व्यक्तिमत्त्वांनी कलापूर्ण मूकपट, मग बोलपट आणि रंगीत चित्रपट निर्माण करून भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात अतिशय मोलाची भर घातली. किंबहुना पुढच्या काळात आलेल्या सामाजिक चित्रपटांच्या लाटेमागे या सर्वांचा चित्रपटसृष्टीची दिशा बदलण्याचा एक जाणीवपूर्वक विचार निश्चितच पथदर्शी होता. अशा या प्रतिभावान दिग्दर्शकाचे ९ नोव्हेंबर १९६७ रोजी निधन झाले.

बाबूरावांची वरकरणी सुसंस्कृत पण अतिशय कपटी सावकाराची भूमिका इतकी परिणामकारक ठरली, की चित्रपटगृहात प्रेक्षक त्यांच्या या भूमिकेला शिव्याशाप देत असत. पूर्वीच्या चित्रपटातले खलनायक जोरजोरात हातवारे करून मोठ्याने गर्जत असत; पण बाबुरावांनी बारीकसारीक लकबींसह वेगळा खलनायक अभिनित केला. म्हणून बोलपटातली त्यांची ही पहिलीच भूमिका त्यांच्या उत्कृष्ट भूमिकांपैकी एक मानली जाते.

अयोध्येचा राजा या चित्रपटासह अग्निकंकण (मराठी, जलती निशानी-हिंदी, १९३२), मायामच्छिंद्र (१९३२), सिंहगड (१९३३), सैरंध्री (१९३३) आणि सीताकल्याणम् (१९३३) अशा सात बोलपटांची निर्मिती प्रभातमध्ये झाली. या सर्व चित्रपटांमध्ये बाबूरावांनी भूमिका केल्या. सीताकल्याणम् या तमिळ चित्रपटाचे दिग्दर्शन बाबूरावांनी स्वतंत्रपणे केले. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# उच्च रक्तदाबावर कशी करावी योगसाधना?

उच्च रक्तदाब हा आजच्या काळातील सर्वात सामान्य जीवनशैलीमुळे निर्माण झालेल्या आजारांपैकी एक आहे. सुरुवातीच्या टप्प्यात त्याची कोणतीही ठळक लक्षणे दिसून येत नाहीत. मात्र कालांतराने तो हृदय, मेंदू, मूत्रपिंड आणि रक्तवाहिन्यांवर गंभीर परिणाम करू शकतो. औषधोपचार, संतुलित आहार, नियमित व्यायाम, वजन नियंत्रण आणि तणावमुक्त जीवनशैली यासोबत योगाभ्यासाचा समावेश केल्यास रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यास मोठी मदत होऊ शकते.



योगामध्ये आसने, प्राणायाम, ध्यान आणि विश्रांती तंत्रांचा समावेश असतो. विशेषतः संथ गतीने केलेली आसने, श्वसनक्रिया आणि ध्यान यांचा अधिक फायदा दिसून येतो. नियमित योगाभ्यासामुळे काही लाभ होतात. मानसिक तणाव आणि चिंता कमी होते. हृदयाचे ठोके नियंत्रित राहतात. झोपेची गुणवत्ता सुधारते. रक्तवाहिन्यांची कार्यक्षमता वाढते. रक्तदाब कमी होण्यास मदत मिळते.

काय करावे?

सौम्य आणि संथ गतीने योगाभ्यास करावा. उच्च रक्तदाब असलेल्या व्यक्तींनी शरीरावर ताण न आणणारी, शांतपणे करता येणारी आसने निवडावीत जसे की, ताडासन, वृक्षासन, वज्रासन, बद्धकोणासन (फुलपाखरू आसन), मार्जारी आसन (कॅट-काऊ स्ट्रेच), शवासन. प्राणायामाचा समावेश करावा. योग्य पद्धतीने केलेले प्राणायाम रक्तदाब नियंत्रणासाठी उपयुक्त ठरतात. दीर्घ श्वसन, अनुलोम-विलोम, भ्रामरी प्राणायाम करावा. प्राणायाम करताना श्वास संथ, सहज आणि नैसर्गिक असावा.

ध्यान आणि विश्रांती तंत्रांचा सराव करावा. ध्यानामुळे मन शांत होते आणि तणाव कमी होतो. ध्यान, योगनिद्रा, शवासन, माइंडफुलनेस मेडिटेशन करावे. त्यात नियमितता ठेवावी. आठवड्यातील बहुतांश दिवस २० ते ३० मिनिटे योगाभ्यास करणे अधिक फायदेशीर ठरते. योगाचा फायदा होत असला तरी डॉक्टरांनी दिलेली औषधे स्वतःहून बंद करू नयेत. नियमित रक्तदाब तपासणी आवश्यक आहे.

योग सुरू करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. विशेषतः अनियंत्रित उच्च रक्तदाब असलेले रुग्ण, हृदयरोगी, स्ट्रोक झालेले रुग्ण, मूत्रपिंडाचे आजार असलेले रुग्ण, ग्लॉकोमा किंवा इतर डोळ्यांचे विकार असलेले रुग्ण. एक साधा मंत्र लक्षात ठेवा उच्च रक्तदाबामध्ये योग करताना वेगापेक्षा शांतता आणि तीव्रतेपेक्षा संतुलन अधिक महत्त्वाचे आहे.

# रायगड जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

**नागोठणे : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त भारतीय जनता पार्टी, नागोठणे यांच्या वतीने नवीन रामेश्वर मंदिर नागोठाणे येथे योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास नागोठणे परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभाग नोंदविला.सकाळी ६ वाजता नागोठणे येथील ज्येष्ठ व प्रसिद्ध वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली योगाभ्यासास प्रारंभ झाला. त्यांनी विविध प्रकारची योगासने उपस्थितांना करून दाखवली तसेच योगाचे महत्त्व पटवून दिले.त्यानंतर योग प्रशिक्षक जानवी रवींद्र गोळे यांनी विविध योगासनांची सविस्तर माहिती देत उपस्थितांकडून त्याचे प्रात्यक्षिक करून घेतले. योगामुळे शारीरिक व मानसिक आरोग्यास होणारे फायदे त्यांनी सोप्या भाषेत समजावून सांगितले.या कार्यक्रमाला भाजपचे ज्येष्ठ नेते मारुती देवरे साहेब यांनी आवर्जून उपस्थिती दर्शवून योग कार्यशाळेचा लाभ घेतला. तसेच शितल नांगरे, अर्पणा सुटे, पल्लवी मढवी, श्रेया कुंटे, शेखर गोळे, धनराज उमाळे, आनंद लाड, कैलास परदेशी, सचिन मोदी, निखिल मढवी, गणेश घाग, अशोक अहिरे सर, विवेक रावकर, गौतम जैन, मंदार परांजपे सर व नरेश भंडारी आदी मान्यवर उपस्थित होते.

आनंद लाड यांनी मनोगत व्यक्त करत योगाचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते व पतंजलीचे वितरक सचिन मोदी यांनी योगाला जागतिक स्तरावर प्रसिद्धी मिळवून देणारे योगगुरू रामदेव बाबा यांचे स्मरण केले. प्रत्येकाने नियमित योगाभ्यास करून निरोगी जीवन जगावे, असे आवाहन त्यांनी केले.

"योग दिनाच्या निमित्ताने केवळ एक दिवस योग करण्यापेक्षा रोजच्या जीवनात योगाचा समावेश केल्यास अनेक आजारांपासून मुक्ती मिळू शकते," असेही त्यांनी सांगितले. यावेळी योग शिबिराचे मार्गदर्शन केल्याबद्दल डॉ. शेळके तसेच योग प्रशिक्षक जानवी रवींद्र गोळे यांचे सचिन मोदी यांनी विशेष आभार मानले.

भविष्यातही नागोठणे शहरात भारतीय जनता पार्टीच्या वतीने नियमित योग शिबिरांचे आयोजन करण्याचा प्रयत्न राहील, असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.



**चौक : प्रतिनिधी**

दरवर्षी २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून जगभरात साजरा केला जातो. योग ही भारताने जगाला दिलेली प्राचीन आणि अमूल्य भेट आहे, जी केवळ एक व्यायाम नसून शरीर, मन आणि आत्मा यांचा समतोल साधणारी सुंदर जीवनशैली आहे, असे प्रतिपादन सभापती कृष्णा पारंगे यांनी केले आहे.



आज योग दिनानिमित्ताने शाळा, विविध सामाजिक संस्था, सार्वजनिक मंडळे यांच्या वतीने योग दिन साजरा करण्यात आला, त्या प्रसंगी एका कार्यक्रमात ते बोलत होते. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर २०१४ मध्ये संयुक्त राष्ट्र सभेत योग दिनाचा प्रस्ताव मांडला होता,या प्रस्तावाला १७७ देशांनी पाठिंबा दिला आणि ११ डिसेंबर २०१४ रोजी दरवर्षी २१ जून रोजी 'योग दिन' साजरा करण्याची घोषणा करण्यात आली.पहिला आंतरराष्ट्रीय योग दिन २१ जून २०१५ रोजी साजरा करण्यात आला. आजच्या धकाधकीच्या आणि ताणतणावाच्या जीवनात निरोगी राहण्यासाठी योगाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. योगासनांमुळे शरीराची लवचिकता वाढते, स्नायू बळकट होतात आणि हाडे मजबूत होतात. प्राणायम आणि ध्यानामुळे मानसिक ताण, चिंता आणि नैराश्य कमी होऊन मन शांत होते.नियमित योगाभ्यासामुळे फुफ्फुसांची कार्यक्षमता वाढते आणि रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते. मधुमेह, उच्च रक्तदाब आणि पाठदुखी यांसारखे आजार नियंत्रित ठेवण्यास योग मदत करतो, असे प्रतिपादन योग शिक्षक यांनी केले आहे.

**धाटाव : प्रतिनिधी**

जागतिक योग दिनानिमित्त रविवार दिनांक २१ जून रोजी रायगड जिल्हा परिषद शाळा तळाघर येथे विविध उपक्रमांनी परिपूर्ण असा योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. सुट्टीचा दिवस असूनही विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व, नियमित योगाभ्यासाचे आरोग्यावर होणारे सकारात्मक परिणाम तसेच "आरोग्यम् धनसंपदा" या संकल्पनेविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी गावाचे सुपुत्र व मान्यवर मार्गदर्शक ज्ञानदेव मुंडे साहेब यांनी विद्यार्थ्यांना योग, आरोग्य आणि पर्यावरण संवर्धन यांचा परस्पर संबंध समजावून सांगत निरोगी जीवनासाठी योगाची आवश्यकता अधोरेखित केली.

या प्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महेश कांबळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. शाळेतील सर्व शिक्षकवृंद, विद्यार्थी तसेच उपस्थित मान्यवरांनी विविध योगासने व प्राणायामाचे प्रात्यक्षिक करून योग दिन साजरा केला.कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे



विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनाचा संकल्प केला. मुंडे यांनी यांच्या मार्गदर्शनातून प्रेरणा घेत प्रत्येक विद्यार्थ्याने किमान चार ते पाच रोपे लावण्याचा निर्धार केला.

ही रोपे आपल्या परिसरात, शेतात किंवा उपलब्ध जागेत लावून त्यांचे संगोपन करण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी व्यक्त केला. योग, आरोग्य आणि पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षकवृंद आणि मान्यवरांचे शाळेच्या वतीने आभार मानण्यात आले.



**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहरात रविवार दि २१ जून जागतिक योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शहरातील विविध सामाजिक संस्था, योग प्रशिक्षक , क्रीडा मंडळे तसेच आरोग्यविषयक संघटनांच्या वतीने मोफत योग शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. नागरिक, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि युवक–युवतींनी या शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

यंदाच्या योग दिनानिमित्त खोपोलीतील विविध भागांमध्ये सकाळच्या सत्रात सामूहिक योगाभ्यासाचे कार्यक्रम पार पडले. तज्ज्ञ योग प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली प्राणायाम, सूर्यनमस्कार, ध्यानधारणा, ताडासन, भुजंगासन, वज्रासन, अनुलोम–विलोम यांसह विविध योगप्रकारांचे प्रात्यक्षिक करण्यात आले. उपस्थितांना योगाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व, शारीरिक व मानसिक आरोग्यावर होणारे सकारात्मक परिणाम तसेच तणावमुक्त जीवनासाठी योगाचे योगदान याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.

शहरातील काही शाळा व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी विशेष योग सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. लहान वयातच योगाची सवय लागावी, शरीर तंदुरुस्त राहावे आणि एकाग्रता वाढावी या उद्देशाने विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व पटवून देण्यात आले. काही ठिकाणी महिलांसाठी स्वतंत्र सत्र, तर ज्येष्ठ नागरिकांसाठी हलक्या स्वरूपातील योगप्रकार व श्वसनाचे व्यायाम घेण्यात आले. योग शिबिरांच्या माध्यमातून 'निरोगी शरीर, निरोगी मन' हा संदेश देण्यात आला. आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत योग हा केवळ व्यायाम नसून तो आरोग्यपूर्ण आणि संतुलित जीवन जगण्याचा प्रभावी मार्ग असल्याचे मत आयोजकांनी व्यक्त केले.

**पाली :** आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून रा.जि.प. शाळा रासळ आदिवासी वाडी येथे विशेष योगाभ्यास वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका स्मिता सुजित जगताप आणि उपशिक्षिका शिवानी पाखरे यांनी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व पटवून दिले. तसेच विद्यार्थ्यांकडून अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने विविध प्रकारची योगासने आणि प्राणायाम करून घेतले. विद्यार्थ्यांनीही यात उत्साहाने सहभाग नोंदवत योगाचे धडे गिरवले. आजच्या आधुनिक आणि कमालीच्या धावपळीच्या युगात मानवाला स्वतःसाठी वेळ देणे अत्यंत कठीण झाले आहे. या बदलत्या व गतिमान जीवनशैलीमुळे मनुष्य वेगवेगळ्या प्रकारच्या शारीरिक आणि मानसिक आजारांनी ग्रासलेला दिसून येत आहे. अत्यंत चिंतेची



बाब म्हणजे अगदी लहान मुलांमध्येही उच्च रक्तदाब, हृदयविकार यांसारख्या गंभीर समस्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. या सर्व अनपेक्षित आजारांचे मुख्य कारण आपली आधुनिक व अयोग्य जीवनशैली हीच आहे. अशा परिस्थितीत मानवी आयुष्य निरोगी, आनंदी आणि दीर्घायुषी बनवण्यासाठी आपल्या दैनंदिन जीवनात योगाचे महत्त्व अनन्यसाधारण ठरते. असे यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

**आमच्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक विकासासाठी योगासने ही केवळ एका दिवसापुरती मर्यादित न ठेवता नियमितपणे करून घेतली जातात. शरीराला कोणतेही अतिरिक्त कष्ट न देता शरीर आणि मन एकाच वेळी सुदृढ व शांत ठेवण्याचे एकमेव सर्वोत्तम साधन म्हणजे योग होय.**

**–स्मिता जगताप,**
**मुख्याध्यापिका,**
**रा.जि.प. शाळा, रासळ**

**पाली : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय योगदिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नवघर येथे विविध उपक्रमांचे आयोजन करत योगदिन अत्यंत उत्साहात आणि चैतन्यमय वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात शाळेतील सर्व विद्यार्थी, मुख्याध्यापक आणि शिक्षक वृंदाने उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेचे उपशिक्षक श्री. राजेंद्र अंबिके यांनी विद्यार्थ्यांना योगदिनाचे औचित्य, मानवी जीवनात योगाचे असणारे अनन्यसाधारण महत्त्व आणि त्याचे दैनंदिन उपयोग याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच आंतरराष्ट्रीय योगदिन २०२६ ची अधिकृत संकल्पना (Theme) "Yoga for Healthy Ageing" (सुदृढ आणि निरोगी दीर्घायुष्यासाठी योग) याविषयी माहिती देऊन, बालपणापासूनच योगाची सवय कशी भविष्यात निरोगी आयुष्याचा पाया रचते, हे सोप्या शब्दांत पटवून दिले.

प्रत्यक्ष योगासने आणि विद्यार्थ्यांचा उत्साह मार्गदर्शनानंतर प्रत्यक्ष योगासनांच्या प्रात्यक्षिकांना सुरुवात झाली. श्री. राजेंद्र अंबिके सरांनी स्वतः प्रत्येक आसनाचे प्रात्यक्षिक दाखवत, ते करताना घ्यायची काळजी आणि श्वासोच्छवासाचे (Breathing Technique) महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.मुक्त हालचाली (Warm-up): शरीराला लवचिकता मिळण्यासाठी सुरुवातीला हलके व्यायाम प्रकार करण्यात आले.उभी आसने: यामध्ये विद्यार्थ्यांनी ताडासन, वृक्षासन आणि त्रिकोणासन अत्यंत अचूकपणे केले.

बैठी आसने: पद्मासन, वज्रासन व मंडूकासन या आसनांचा सराव करण्यात आला. झोपून करायची व पाठीवरची आसने: पाठीवर झोपून करायची विविध आसने, ध्यान, प्राणायाम मुलांचे लाडके 'आनंदासन' व 'फुलपाखरू आसन' विद्यार्थ्यांनी मोठ्या आनंदाने केले.







**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील जामरुंग ग्रामपंचायत हद्दीतील कामतपाडा गाव येथील शांतिक्षेत्र प्रेमगिरी आश्रमात मैत्रीबोध परिवाराच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात आणि आध्यात्मिक वातावरणात साजरा करण्यात आला. भारत सरकारचे केंद्रीय संस्कृती व पर्यटन मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांच्या प्रमुख उपस्थितीमुळे या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. योग, संस्कृती, अध्यात्म आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश देणाऱ्या या सोहळ्याला शेकडो नागरिक, मान्यवर, सिनेकलाकार आणि विविध क्षेत्रातील प्रतिनिधींनी उपस्थिती लावली.

उपस्थितांना संबोधित करताना केंद्रीय मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनी योग हा केवळ शारीरिक व्यायाम नसून भारताच्या समृद्ध सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचे प्रतीक असल्याचे सांगितले. आधुनिक तंत्रज्ञान आणि नवकल्पनांच्या युगात भारताला जागतिक नेतृत्व मिळवून देण्यासाठी आपल्या सांस्कृतिक मूल्यांची जपणूक तितकीच महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले. भारतीय संस्कृती, योग आणि अध्यात्म हीच भारताची खरी ओळख असून याच बळावर भारत जगात वेगळी छाप निर्माण करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी मैत्रीबोध परिवाराचे संस्थापक व मार्गदर्शक पूज्य मैत्रेय दादाश्रीजी यांनी व्यक्तीच्या आंतरिक परिवर्तनातूनच समाजपरिवर्तन घडू शकते, असा संदेश दिला. मैत्री, संस्कृती आणि अध्यात्म ही मूल्ये समाजाला एकत्र बांधण्याचे कार्य करतात आणि भारताला विश्वगुरू बनविण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाला श्री गोपाल कृष्ण अग्रवाल, कर्जत–खालापूर मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर आणि सिनेसृष्टीतील कलाकारांचीही उपस्थिती लाभली. सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक क्षेत्रात मैत्रीबोध परिवार करत असलेल्या कार्याचे यावेळी मान्यवरांनी कौतुक केले. योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सामूहिक योगाभ्यास, गणेश वंदना तसेच भारताची प्राचीन योगिक परंपरा असलेल्या मल्लखांबाचे नेत्रदीपक सादरीकरण करण्यात आले. मल्लखांबच्या माध्यमातून शारीरिक क्षमता, संतुलन, शिस्त आणि आत्मविश्वास यांचे दर्शन घडले.


## महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, पनवेल पिनकोड ४१० २०६**
E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in

**दूरध्वनी क्रमांक ०२२- २७४५२७७८ फॅक्स - ०२२-२७४६७४४०**
**ई- कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ०६ (ई-निविदा) सन २०२६-२७**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप- या निविदेमध्ये एकूण ०२ काम समाविष्ठ असुन ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक २०.०६.२०२६ सकाळी १०.०० ते दिनांक २९.०६.२०२६ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

ई-निविदाजा.क्र./सा.बां./पनवेल /
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड
दिनांक :-

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम**
**विभाग, पनवेल**

क्रमांक : आरओसी-२०२६-२७/क्र-५/C१२२४



## जाहिर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहिर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, नामुबाई विश्वनाथ पाटील, मधुकर शंकर पाटील, महेश अनंत गोंधळी, जयवंती अमृत ठाकूर, मिनाक्षी हरिश्चंद्र पाटील, मुकेश दत्तात्रेय मढवी, रेणुका दत्तात्रेय मढवी, अस्मिता शरद शेळके, मेघनाथ अमृत मढवी, कश्यप मंगेश मढवी, पुर्वा मंगेश मढवी, पुनम मंगेश मढवी यांचे मालकीची व ताबेकबजातील मौजे जांभुळपाडा, ता. उरण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिनीची मिळकत आहे.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे जांभुळपाडा, ता. उरण, जि. रायगड.**

| गट क्र./सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ११ | १ | ०-२४-५० पो.ख.०-०३-८० एकुण ०-२८-३० | ५.९४ |

वरील वर्णनाची मिळकत विदयमान मालकांकडून आमचे आशिलांनी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीमध्ये अगर सदर मिळकतीचे कोणत्याही भागावर कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा, मालकीहक्क, ताबाकबजा, गहाण, दान, बक्षीसपत्र, साठेकरार अगर अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी, हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून, १५ दिवसांच्या आंत त्यांची हरकत कागदोपत्री पुराव्यासहीत खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवाव्यात. मुदतीत हरकत न आल्यास, वरील मिळकत निर्वेध, विनाहरकत व बोजारहित आहे. असे समजुन आमचे आशिल सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाया हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : २०.०६.२०२६**

**सही /-**
**ॲड. श्री. एकनाथ जी. खुटले**
**कार्या. शॉप नं. १, पारस प्लाझा,**
**गांवदेवी मंदिराजवळ, पनवेल,**
**ता. पनवेल, जि. रायगड.**
**पिन. ४१० २०६ मो.नं. ९८६७१३२०२२**



## सावधान नोटीस

सर्व जनतेस या सावधान नोटीसीने कळविण्यात येत आहे की, खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे अधिकार अभिलेखी नमूद असणारे मुळमालक कमळी काळ्या पाटील यांचे वारसदार १) कै. लाडकूबाई उर्फ लक्ष्मी लक्ष्मण पंडित मयत मुलगी तर्फे वारस १. १) श्री. चंद्रकांत लक्ष्मण पंडित १.२) कै. सीताराम लक्ष्मण पंडित (मयत नातू) तर्फे वारस १.२.१) श्रीमती. अंजनी सीताराम पंडित १.२.२) श्रीमती. मनीषा सीताराम पंडित १.२.३) श्री. अलंकार सीताराम पंडित १.३) श्री. प्रभाकर लक्ष्मण पंडित १.४) श्रीमती. सुशीला हरी भोईर २) कै. जनाबाई नामदेव पंडित मयत मुलगी तर्फे वारस २.१) श्री. रामनाथ नामदेव पंडित २. २) श्रीमती. अनुसया दिलीप केणी २.३) श्रीमती. सुनीता राजेश मोहिते, ३) कै. बयोवबाई गोपीनाथ मोहिते मयत मुलगी तर्फे वारस ३.१) श्री. गणेश गोपीनाथ मोहिते ३.२) श्री. विजय गोपीनाथ मोहिते ३. ३) श्री. दयानंद गोपीनाथ मोहिते ३.४) श्रीमती. प्रतिभा धर्मेंद्र घरत ४) कै. यमुनाबाई मधुकर पाटील मयत मुलगी तर्फे वारस ४.१) श्री. प्रकाश मधुकर पाटील ४.२) श्रीमती. कुंदाबाई जनार्दन भोईर ४.३) श्रीमती. प्रमिला गणेश भगत ४.४) श्रीमती. तुलना सुदाम झावरे ४.५) कै. संजय मधुकर पाटील मयत तर्फे वारस ४.५.१) श्रीमती. शोभा संजय पाटील ४.५.२) श्री. विकी संजय पाटील ४.५.३) श्री. विराज संजय पाटील ५) श्रीमती. कासूबाई चंदर पाटील यांनी माझे अशिल **श्री. मोहनीश ओमप्रकाश छाजेर** यांना सदर मिळकत कायम विकत देण्याचे मान्य व कबूल करून, त्या संदर्भात साक्षीदारांसमक्ष सह्या करून दिनांक ३१ ऑक्टोबर २०२३ रोजी करार केलेला आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे- बेलोंडाखार, ता उरण व जिल्हा रायगड**

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर. पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ९४ | ६ | ०-३७-७० पो.ख ०-००-९० एकुण ०-३८-६० | ५.८७ |
| ९५ | १/ब | ०-२७-८० पो.ख ०-०४-३० एकुण ०-३२-१० | ४.२५ |

तरी सर्व जनतेस या सावधान नोटीसीने कळविण्यात येत आहे की, वरील मिळकती संदर्भात कोणीही वरील नमूद वारसदार अथवा तसे दाखवू पाहणारे इतर कुणीही यांच्यासोबत व इतर कोणाबरोबरही कसलाही खरेदीचा व्यवहार व ठराव करू नये. मात्र या उप्परही कोणीही कसलाही खरेदीचा व्यवहार केल्यास, सदरहू व्यवहार माझ्या अशिलांवर बंधनकारक असणार नाही. व सदर मिळकतीवर प्रथम हक्काने माझ्या अशिलांचा हक्क व अधिकार राहील. तसेच माझ्या अशीलांची फसवणूक करून व्यवहार कोणताही केल्यास, ते सर्व कायदेशीर कारवाईस पात्र होतील, याची नोंद घ्यावी.

**दिनांक : २२/०६/२०२६**

**सही /-**
**ॲड. अस्वले सदिच्छा दिलीप**
**फ्लॅट न. २०३, अ विंग, मोहिनील अपार्टमेंट,**
**नवे पोपुड, नागाव रोड, उरण, रायगड**
**मो. नं. ७४०००९७२८६**

# जागतिक योगदिनानिमित्त ठिकठिकाणी कार्यक्रम

## वाशीत मंत्री गणेश नाईक यांनी केले योग प्रात्यक्षिक



**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छतेतून आरोग्य व आरोग्यासाठी योग असा संदेश देत नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने सिडको आणि द आर्ट ऑफ लिव्हिंग यांच्या सहकार्याने वाशी येथील सिडको प्रदर्शनी केंद्रात आयोजित योगविषयक विशेष कार्यक्रमात पाच हजारांहून अधिक नागरिकांनी सहभाग घेतला. यावर्षी निरोगी वृद्धत्वासाठी योग या संकल्पनेवर आधारित आंतरराष्ट्रीय योग दिन जगभरात साजरा करण्यात आला.

याप्रसंगी वनमंत्री गणेश नाईक, महापौर सुजाता पाटील, आमदार मंदा म्हात्रे, महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम समितीचे सभापती गिरीश म्हात्रे, उपसभापती राजू मढवी, आरोग्य समिती सभापती डॉ. जयाजी नाथ, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, शिक्षण विभाग उपायुक्त संघरत्ना खिल्लारे, क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव, प्रजापिता ब्रह्मकुमारी विश्वविद्यालयाच्या शिलादिदी, द आर्ट ऑफ लिव्हिंगचे रत्नेश्वर शेट्ये, योग प्रशिक्षक प्रमोद कोकणे व दिप्ती देशपांडे आदी मान्यवर तसेच अधिकारी, नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मानसिक शांती व शारीरिक क्षमतावृद्धी करणाऱ्या योगाचे महत्त्व जगभरातील लोकांना समजले आहे. केवळ आजच्या योग दिनापुरते नाही तर वर्षाचे ३६५ दिवस योगासनांच्या माध्यमातून प्रत्येकाने आपले आरोग्य जपावे, असे आवाहन वनमंत्री गणेश नाईक यांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी योग दिनाच्या माध्यमातून जगभरात योगाचे महत्त्व वाढवले, असे ते म्हणाले. योगासनांदरम्यान वनमंत्री नाईक व आयुक्त शिंदे यांनी एकमेकांना आधार देत आसने केल्याचे विशेष दृश्य पहायला मिळाले. महापौर सुजाता पाटील यांनी आदीनाथ शंकरांपासून योगविद्येची सुरुवात झाली. असे सांगत ऋषीमुनींपासून चालत आलेले हे योग ज्ञान आरोग्यासाठी महत्त्वाचे असल्याचे नमूद केले.

आमदार म्हात्रे यांनी पंतप्रधानांच्या प्रेरणेतून मागील १२ वर्षांपासून नवी मुंबईत सातत्याने योगविषयक कार्यक्रमांचे आयोजन होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला. आपण योगामुळे मनाने नेहमी तरुण राहतो, असेही त्या म्हणाल्या. द आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रशिक्षक प्रमोद कोकणे व दिप्ती देशपांडे यांनी सहज पद्धतीने योगक्रिया करून घेतल्या, तर प्रजापिता ब्रह्मकुमारी विश्वविद्यालयाच्या शिलादिदी यांनी मनःशांतीची प्रात्यक्षिके घेतली.

## शिरवणे येथे भाजपतर्फे योगसाधना



**नवी मुंबई : बातमीदार**

भारतीय जनता पार्टी नवी मुंबई जिल्हाच्या वतीने नेरुळ येथील शिरवणे विद्यालय व ज्युनियर कॉलेज येथे जागतिक योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला भाजप नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील उपस्थित होते. यावेळी डॉक्टरांनी योग का केला पाहिजे आणि त्याचे फायदे आपल्या जीवनात किती व काय आहेत याचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. त्याचबरोबर संपूर्ण जगामध्ये मोठ्या उत्साहात योग दिन साजरा केला जात आहे. या कार्यक्रमासाठी शाळेच्या प्राचार्या भाग्यश्री चौधरी, योग शिक्षिका, योग तज्ज्ञ व विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी आणि कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

यावेळी डॉ. राजेश पाटील यांनी सांगितले की, आज योग दिनानिमित्त विविध संस्थांना सोबत घेऊन नवी मुंबई स्तरावर जागतिक योग दिन साजरा करत आहोत. सध्याची आपली जीवनशैली निसर्गाच्या विरुद्ध सुरू आहे. अनेक व्याधींनी मनुष्य ग्रस्त आहे. प्रत्येकाला निरोगी, व्याधिमुक्त आयुष्य मिळावे यासाठी योग केला पाहिजे. घराघरात, मुलांमध्ये योग पोहचला पाहिजे. म्हणून भाजपच्या माध्यमातून सर्व पदाधिकारी, नागरिक, विद्यार्थी-शिक्षक मिळून योग दिन साजरा करत आहोत.

## भाजप वाशी मंडळातर्फे योग शिबिर उत्साहात



**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक योग दिनाच्या निमित्ताने भारतीय जनता पार्टी वाशी मंडळाच्या वतीने वाशी येथील सेक्टर-९ मधील जनसंपर्क कार्यालयात योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. मागील पाच वर्षांप्रमाणे यंदाही हा उपक्रम उत्साहात पार पडला. बेलापूर विधानसभा मतदारसंघाच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या सूचनेनुसार आणि बेलापूर विधानसभा महामंत्री निलेश म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली व मंडळ अध्यक्ष विकास बबन सोरटे यांच्या नेतृत्वाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

योग शिबिराचे आयोजन कविता पांडे, योग शिक्षिका पतंजली योग समिती यांच्या देखरेखीत दोन सत्रांमध्ये करण्यात आले. सकाळी ७.३० ते ८.०० आणि ८.०० ते ८.४५ या वेळेत योग प्रशिक्षण देण्यात आले. विभागातील महिला व पुरुषांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. अंदाजे ५० ते ६० नागरिकांनी उपस्थित राहून योग दिनाचा कार्यक्रम यशस्वी केला. कार्यक्रमास भाजपच्या वाशी मंडळातील कल्पना छत्रे, मुकुंद विश्वासराव यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच योग दिनाच्या संयोजिका जिल्हा सचिव मालती सोनी, मंडळाचे महामंत्री भरत मावळे व कोषाध्यक्ष जयंत पाटील यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. यावेळी उपस्थित सर्व योग प्रशिक्षणार्थी व नागरिकांचे आयोजकांच्या वतीने आभार मानण्यात आले.

## योग ही भारताने जगाला दिलेली देणगी -आमदार मंदा म्हात्रे



**नवी मुंबई : बातमीदार**

देशभरात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा झाला. याच अनुषंगाने सालाबादप्रमाणे यावर्षीही नवी मुंबई महानगरपालिका आयोजित सिडको व द आर्ट ऑफ लिव्हिंग यांच्या सहकार्याने वाशी येथील सिडको एक्झिबिशन हॉल येथे आंतरराष्ट्रीय योग दिनाचा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाची सुरुवात बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाली. यावेळी आमदार मंदा म्हात्रे म्हणाल्या की, दैनंदिन जीवनाच्या धावपळीत शारीरिक व मानसिक आरोग्य राखण्यासाठी नियमित योगासने करणे गरजेचे आहे. 'योग' ही भारताने जगाला दिलेली देणगी आहे.

शरीर व मनाच्या उत्तम आरोग्यासाठी योग महत्त्वाचे आहे. आजच्या धकाधकीच्या आयुष्यात ताणतणाव वाढला आहे. या ताणतणावावर योग हा अत्यंत महत्त्वाचा उपाय आहे. योगसाधनेमुळे असाध्य आजारही बरे होतात. आज राज्यात सर्वदूर योग दिनाचे अनेक कार्यक्रम होत आहेत ही निश्चितच आनंदाची आणि कौतुकाची गोष्ट आहे.



## विद्यार्थ्यांसह माजी आमदार संदीप नाईक यांनी केला योग

**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक योग दिनाच्या निमित्ताने आयोजित विशेष योग सत्रात माजी आमदार संदीप नाईक यांनी शाळकरी विद्यार्थ्यांसमवेत विविध योगासने व प्राणायामाची प्रात्यक्षिके केली. उत्साह, शिस्त आणि सकारात्मक ऊर्जेने भरलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मोठ्या आनंदाने योगाभ्यास करून निरोगी जीवनाचा संदेश दिला. क्रीडा भारतीचे कोषाध्यक्ष सतीश जोशी, क्रीडा प्रमुख मस्कर, अमिता भट आदी मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते.

योग ही भारताने जगाला दिलेली अमूल्य देणगी असून शरीर, मन आणि बुद्धी यांचा समतोल साधण्याचे प्रभावी माध्यम आहे. योगाला जागतिक पातळीवर नेण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अमूल्य योगदान असल्याचेही संदीप नाईक म्हणाले. आजच्या धकाधकीच्या आणि तणावपूर्ण जीवनशैलीत शारीरिक स्वास्थ्याबरोबरच मानसिक स्थैर्य व एकाग्रता टिकवून ठेवण्यासाठी योगाचे महत्त्व अधिक वाढले आहे. विद्यार्थ्यांनी लहानपणापासून योगाला आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनवल्यास त्यांच्यात आत्मविश्वास, शिस्त, एकाग्रता आणि सकारात्मक विचारसरणी विकसित होण्यास मोठी मदत होईल, असे आवाहन संदीप नाईक यांनी केले.

यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांनी नियमित योगाभ्यासाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच निरोगी, सुदृढ आणि सक्षम समाज घडवण्यासाठी योग संस्कृती प्रत्येक घरापर्यंत पोहचवण्याचे आवाहन केले. कोविड काळात संपूर्ण जग स्तब्ध झाले असताना जगाला त्यातून बाहेर काढण्यासाठी योगाने प्रचंड मोठे सामर्थ्य दिले. हा भारतीय संस्कृती, प्रगल्भता आणि आध्यात्मिक शक्तीचा एक वरदहस्त होय. योग दिनाच्या मुहूर्तावर आपण आपल्या आरोग्याचा संकल्प करून डॉक्टर आणि औषधांपासून दूर राहून शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम राहण्यासाठी योग महत्त्वाचा आहे, असे ते म्हणाले.

## निवडक

### परदेशी व्यक्तीला भाडेकरू ठेवल्याप्रकरणी गुन्हा

**नवीन पनवेल :** परदेशी नागरिकाला घर भाड्याने देऊन सी फॉर्म न भरता त्याला बेकायदेशीररित्या राहण्यास मदत केल्याप्रकरणी अमित अशोक सिंग यांच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात १८ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सानपाडा येथे राहणारे अमित अशोक सिंग यांनी नायजेरियन नागरिकाला शासनाच्या ऑनलाइन अधिकृत वेबसाइटवर सी फॉर्म न भरता त्याला निसर्ग कॉम्प्लेक्स, फरशीपाडा, खारघर येथील घर भाड्याने देऊन बेकायदेशीररित्या राहण्यास मदत केली. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नागरिकांनी व्यवस्थित खात्री केल्याशिवाय कोणालाही आपली रूम भाड्याने देऊ नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### रेल्वेच्या धडकेत एकाचा मृत्यू

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील मोठे भिंगार गावाजवळ एका अनोळखी इसमाला तेथून जाणाऱ्या रेल्वेची धडक बसून झालेल्या दुर्घटनेत त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला असून त्याच्या नातेवाइकांचा शोध पनवेल तालुका पोलीस घेत आहेत. सदर अनोळखी इसमाचे वय अंदाजे ३५ वर्ष आहे. धावत्या रेल्वेची धडक बसल्याने त्याच्या शरीराचे दोन तुकडे झाले आहेत. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा पोउपनि. सरदार वसेकर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## जेएनपीएतही आंतरराष्ट्रीय योग दिनाचा उत्साह

**उरण : वार्ताहर**

भारतातील सर्वात मोठे कंटेनर बंदर असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाने (जेएनपीए) केंद्रीय आयुष मंत्रालयाच्या निर्देशांनुसार तसेच केंद्रीय बंदरे, जलवाहतूक आणि जलमार्ग मंत्रालयाकडून प्राप्त झालेल्या सूचनांच्या अनुषंगाने आपल्या परिसरात आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६ उत्साहात साजरा केला. यंदाच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची "योग फॉर हेल्दी एजिंग" म्हणजेच 'निरोगी वार्धक्यासाठी योग' ही जागतिक संकल्पना केंद्रस्थानी ठेवून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

योग दिनानिमित्त जेएनपीएमध्ये तज्ज्ञ योग प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विशेष योग सत्राचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर ब्रह्माकुमारी संस्थेच्या प्रतिनिधींनी सखोल ध्यान सत्र घेतले. या कार्यक्रमात जेएनपीएचे अध्यक्ष गौरव दयाल, भा. प्र. से., उपाध्यक्ष रवीश कुमार सिंह, भा. रे. वा. से., सीआयएसएफचे कमांडंट, सीआयएसएफ जवान तसेच जेएनपीएचे अधिकारी आणि कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत निरोगीपणा, मानसिक स्वास्थ्य आणि सजगतेचा संदेश आत्मसात केला. यावेळी बोलताना अध्यक्ष गौरव दयाल म्हणाले, "आंतरराष्ट्रीय योग दिन आपल्याला दैनंदिन धावपळीतून काही क्षण स्वतःसाठी काढण्याची, आत्मपरीक्षण करण्याची आणि दीर्घकालीन आरोग्य, आनंद व सर्वांगीण कल्याणाला चालना देणाऱ्या सवयी अंगीकारण्याची संधी देतो.

योग ही भारताच्या प्राचीन ज्ञानपरंपरेची अमूल्य देणगी असून, आजही तो जगभरातील लोकांना संतुलित, निरोगी आणि सकारात्मक जीवनशैलीचा मार्ग दाखवत आहे. योग ही केवळ एक साधना नसून निरोगी जीवन जगण्याची एक जीवनपद्धती आहे. जेएनपीए कुटुंब म्हणून आम्ही हा दिवस उत्साहाने आणि अधिक आरोग्यदायी जीवनशैली स्वीकारण्याच्या सामूहिक संकल्पासह साजरा करत आहोत." निरोगी जीवनशैलीचा संदेश अधिक व्यापक स्तरावर पोहोचविण्यासाठी आणि जनसामान्यांचा सहभाग वाढविण्यासाठी जेएनपीएने आपल्या विविध डिजिटल माध्यमांवर विशेष योग दिन सोशल मीडिया मोहीमही राबवली.

या मोहिमेद्वारे योगाचे महत्त्व तसेच यंदाची "योग फॉर हेल्दी एजिंग" ही संकल्पना प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्यात आली.अशा उपक्रमांच्या माध्यमातून जेएनपीए आपल्या कर्मचारीवर्गामध्ये शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक स्वास्थ्य आणि काम-जीवन समतोलाची संस्कृती रुजविण्यास सातत्याने प्रोत्साहन देत आहे. तसेच, योगाला जीवनशैलीचा अविभाज्य भाग म्हणून स्वीकारण्याच्या राष्ट्रीय जनआंदोलनाला बळकटी देण्यातही जेएनपीए सक्रिय योगदान देत आहे.



## ऐरोलीत नमोस्तुते चौथे पर्व संगीतमय सोहळा



**नवी मुंबई : बातमीदार**

नादवेणू संगीत क्लासेसच्या वतीने आयोजित 'नमोस्तुते-चौथे पर्व' हा भव्य संगीत सोहळा नुकताच ऐरोली सेक्टर ५ येथील जानकीबाई मढवी सभागृहात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. संगीत, संस्कार आणि कलासाधनेचा सुंदर संगम असलेल्या या कार्यक्रमाला रसिकांनी तुडूंब गर्दी केली होती. कार्यक्रमाच्या काही दिवस आधीच सर्व प्रवेशिका संपल्याने हा सोहळा हाऊसफुल ठरला. या कार्यक्रमात नादवेणू क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे प्रभावी दर्शन घडवले.

संस्थेच्या ८०हून अधिक बासरीवादक आणि ३०हून अधिक हार्मोनियम वादक विद्यार्थ्यांनी सामूहिक सादरीकरणातून रसिकांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी हार्मोनियमवर 'ससा तो ससा', 'रमया वत्सावया' तर बासरीवर 'मिया की तोडी' आणि प्रार्थना सादर केली. विशेषतः विद्यार्थिनींनी सादर केलेल्या 'गोंधळ' या सादरीकरणाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. नादवेणूचे संस्थापक आकाश सूर्यवंशी यांचे बासरी एकल वादन आणि अंकिता सूर्यवंशी यांचे हार्मोनियम एकल वादन हे कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले. त्यांना किरण पाटील आणि भावेश गवई यांनी तबल्यावर साथ दिली. या सोहळ्याला आंतरराष्ट्रीय ख्यातीचे बासरीवादक पंडित विवेक सोनार आणि बनारस घराण्याचे प्रसिद्ध तबलावादक पंडित कालीनाथ मिश्रा यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली.

आर्यन पाटील (हँडसॉनिक), विघ्नेश देसाई (तबला), विशाल गायकवाड (तबला), राज सिनलकर (सिंथेसायझर) आणि कुणाल कालेकर (ऑक्टोपॅड) यांनी उत्कृष्ट साथसंगत केली. अमर गायकवाड आणि फाल्गुनी जोशी-नातू यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. संगीत क्षेत्रात प्रगती करणाऱ्या तीन गुणवंत विद्यार्थ्यांना यावेळी 'पंडित विवेक सोनार शिष्यवृत्ती' देऊन गौरवण्यात आले. प्रत्येक सादरीकरणाला रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात भरभरून प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे सर्व सदस्य, विद्यार्थी आणि पालकांनी परिश्रम घेतले.

# निरोगी आणि आनंदी राहण्यासाठी योगसाधना महत्त्वाची -जिल्हाधिकारी

**अलिबाग : प्रतिनिधी**

प्रत्येकाने निरोगी आणि आनंदी राहण्यासाठी आपल्या जीवनात योगसाधना करणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी रविवारी केले.

जिल्हा प्रशासन व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा क्रीडा संकुल, नेहूली येथील प्रशस्त बॅडमिंटन हॉल येथे आयोजित आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, ॲड. निहा राऊत, तालुका क्रीडा अधिकारी राजेंद्र अतनूर, क्रीडा अधिकारी सुचिता ढमाले, राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी तथा प्रिझम संस्थेच्या अध्यक्षा तपस्वी नंदकुमार गोंधळी, स्वयंसिद्धा संस्थेच्या अध्यक्षा सुचिता साळवी, क्रीडा विभागाचे आकाश डोंगरे, श्री अंबिका योग कुटीरचे संस्थापक विरेंद्र पवार या संस्थेचे प्रशिक्षक





तसेच प्रिझम सामाजिक विकास संस्थेचे स्वयंसेवक, पी.एन.पी. शाळेचे विद्यार्थी व शिक्षक वृंद, स्पर्धा विश्व अकॅडमीचे प्रशिक्षणार्थी, सरकारी अधिकारी, कर्मचारी आदी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी म्हणाले की, आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संयुक्त राष्ट्र महासभेत भाषण करताना संपूर्ण जगाला योगाचे महत्त्व पटवून दिले. संयुक्त राष्ट्र महासभेने अधिकृतपणे २१ जून हा 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून घोषित केला. अप्राप्त वस्तू प्राप्त होणे याला योग म्हणतात. प्राणायाम ध्यान आसने यातून मानसिक एकाग्रता वाढते. यातून आपल्याला जे साध्य करायचे आहे ते साध्य होते. नेमून दिलेले कर्म विहित वेळेत, सातत्याने केले तर आपण चांगल्या विश्वाची निर्मिती करू शकतो. एकाग्रता मिळवण्यासाठी योग केले पाहिजे आणि योगात सातत्य आवश्यक आहे आणि आयुष्यात शिस्तीची गरज आहे. शिस्त योगाद्वारे लागते, आरोग्य सुधारते. आज प्रत्येकाला ताण–तणावाला सामोरे जावे लागते. त्यामुळे तणावमुक्त राहण्यासाठी आपण सर्वांनी आपल्या जीवनशैलीमध्ये नियमितपणे योगा, व्यायामांचा समावेश करावा. योग हा फक्त व्यायाम नसून योगामुळे शारिरीक, मानसिक आरोग्य सुदृढ राहते. नियमित योगासने केल्याने शरीराला ऊर्जा प्राप्त होत असते. योगामुळे मनःशांती तर मिळतेच शिवाय तणाव दूर होऊन एकाग्रता सुध्दा वाढण्यास मदत होते, असेही जिल्हाधिकारी म्हणाले. जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी देखील उपस्थितांना आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या शुभेच्छा देत आपल्या आरोग्यासाठी नियमित योगा करण्याचे आव्हान केले.

यावेळी स्पर्धा विश्व अकॅडमीचा विद्यार्थी सौरभ समीर वर्तक याची भारतीय सैन्य दलात निवड झाल्याबद्दल व समीक्षा तांडेल हिची नवीमुंबई पोलीस दलात निवड झाल्याबद्दल मान्यवरच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

## चौक येथील फायबर गोडाऊनला आग

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई पुणे जुन्या महामार्गावरील चौक गावातील गणेश मंदिराच्या जवळ असणाऱ्या फायबर गोडाऊन ला अचानक आग लागली.

हायवे च्या लगत मोठ्या प्रमाणात आग लागल्याची माहिती मिळत आहे. आगीची माहिती मिळताच खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार व सहकारी पोलिस घटनास्थळी दाखल झाले. तात्काळ खोपोली अग्निशमन दल, रिलायन्स व आसपासच्या ४ अग्निशमन दलाचे बंब व जवान घटनास्थळी दाखल होत तासाच्या अथक प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळवले. गोडाऊन मधे फायबरचे फ्लेमेबल प्रॉडक्ट, रेझीन इत्यादी साहित्य असल्याने आग वाढवण्यास कारणीभूत ठरले परंतु जवानांनी जीवावर उदार होऊन आगीचा सामना केला व आग आटोक्यात आणली.

खालापूर तहसीलदार अभय चव्हाण, पोलीस निरीक्षक सचिन पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल पवार, हेल्प फाउंडेशनचे निखिल मालुसरे व सहकाऱ्यांनी तत्परता दाखवल्याने मोठा अनर्थ टळला.



## रसायनीत पोलीस भरतीच्या नावाखाली फसवणूक; तिघे अटकेत

**खोपोली, रसायनी : प्रतिनिधी**

मुंबई पोलीस दलात नोकरीला लावतो अशी बतावणी करून तरुणीचे जवळपास नऊ लाख रुपये उकळणाऱ्या तीन जणांना रसायानी पोलिसांनी अटक केली आहे. आरोपींमध्ये एका महिलेचा समावेश आहे.

खालापूर तालुक्यातील वाणीवली गाव येथे राहणारी अंकिता राजेंद्र थोरवे हिला आरोपी संतोष वाळुंज (रा. तळोजा), उज्वला सुनील पाटील आणि तिचा पती सुनील पाटील (रा.वडगाव, खालापूर) यांनी नवी मुंबई पोलीस दलात नोकरीला लावतो असे आश्वासन देत ५० हजार रुपये रोख आणि साडेआठ लाख रुपये चेक द्वारे घेतले, परंतु दोन महिने उलटूनदेखील आरोपी नोकरीला लावत नसल्याने अंकिताने पैसे परत मागितले, मात्र उज्वला व तिचा पती सुनील पैसे देण्यास टाळाटाळ करू लागल्याने अंकिताने रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानंतर पोलिसांनी तीनही आरोपींना रात्री अटक केली आहे.

## 'एसआयआर' अंतर्गत महाडमध्ये दोन लाख मतदारांचे मॅपिंग पूर्ण

**महाड : प्रतिनिधी**

निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम २०२६ अंतर्गत महाड विधानसभा मतदारसंघातील ८२.५७ टक्के मॅपिंगचे काम पूर्ण झाले असून २० जूनपासून या कार्यक्रमाचा प्रमुख टप्पा सुरू होत आहे. ३० जूनपासून बीएलओ व बीएलए घरोघर जाऊन मतदारांचे सर्वेक्षण करणार असून २९ जुलैपर्यंत हा पहिला टप्पा पूर्ण होणार असल्याची माहिती महाडचे उपविभागीय अधिकारी पोपटराव ओमासे यांनी दिली.




महाड विधानसभा मतदारसंघात माणगाव, महाड व पोलादपूर या तीन तालुक्यांतील एकूण २ लाख ९५ हजार ४४९ मतदारांपैकी २ लाख ४३ हजार ९५० मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले आहे. ५१,४९९ मतदारांचे मॅपिंग अद्याप बाकी आहे. तालुकानिहाय आकडेवारीनुसार माणगावमध्ये ८९,०९७ पैकी ७५,४००, महाडमध्ये १ लाख ६२,१३० पैकी १ लाख ३३,१३४ तर पोलादपूरमध्ये ४४,२२२ पैकी ३५,४१६ मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले आहे.यापुढील टप्प्यात बीएलओ व बीएलए संयुक्तपणे सर्व २ लाख ९५ हजार ४४९ मतदारांपर्यंत पोहोचणार आहेत. यावेळी प्रत्येक मतदाराला मतदार यादी क्रमांक, फोटो व इतर माहितीसह दोन फॉर्म दिले जातील. त्यापैकी एक फॉर्म भरून बीएलओकडे सादर करायचा आहे.


१८ वर्षे पूर्ण झालेल्या नव मतदारांसाठी फॉर्म क्रमांक सहा व स्वयंघोषणापत्र भरून द्यावे लागणार आहे. हे सर्वेक्षण ३० जून ते २९ जुलै या दरम्यान घरोघर जाऊन होणार आहे. त्यामुळे सर्व मतदारांनी किंवा कुटुंबप्रमुखांनी यादरम्यान घरी उपस्थित राहून बीएलओंना परिपूर्ण माहिती द्यावी, असे आवाहन उपविभागीय अधिकारी ओमासे यांनी केले आहे.१९८७ पूर्वी ज्यांचा जन्म झाला आहे, त्यांना १२ पैकी एक पुरावा सादर करावा लागणार आहे. महाड विधानसभा मतदारसंघात १,२०० पेक्षा जास्त मतदार संख्या असलेली २७ मतदान केंद्रे असून त्यांचे विभाजन होणार आहे. यामध्ये माणगाव तालुक्यात ११, महाडमध्ये १५ व पोलादपूर तालुक्यात एका मतदान केंद्राचे विभाजन होणार आहे. त्यामुळे भविष्यात महाड विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रांची संख्या ३९३ वरून ४१० होणार आहे.

५ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार याद्यांची प्रसिद्धी होईल व ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या दरम्यान दावे व हरकती दाखल करता येतील. ५ ऑगस्ट ते ३ ऑक्टोबर यादरम्यान नोटीस, दावे व हरकती निकालात काढण्यात येतील व ७ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. यानंतर मतदार यादीत नाव समाविष्ट करता येणार नाही. मात्र १८ वर्षे पूर्ण झालेल्या नव मतदारांना घोषणापत्रासह फॉर्म सहा भरून नोंदणी करता येईल. या कार्यक्रमात बीएलओ सोबत सर्व राजकीय पक्षांचे बीएलए देखील काम करणार आहेत. महाड विधानसभा मतदारसंघात सध्या केवळ भारतीय जनता पक्षाने १६३ बीएलए यांची नियुक्ती केली आहे.

## पाऊस लांबल्यास खालापुरात तीव्र पाणीटंचाईचे संकट

**चौक : प्रतिनिधी**

पावसाने ओढ दिल्यास खालापूर तालुक्यात तीव्र पाणीटंचाई निर्माण होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. तालुक्यात तीन धरणे, एक वळण बंधारा, नवी मुंबईला पाणीपुरवठा करणारे मोरबे धरण आणि वर्षभर वाहणारी पाताळगंगा नदी असतानाही निम्म्याहून अधिक गावांत पाणी टंचाई आहे. पाऊस आणखी लांबल्यास परिस्थिती बिकट होईल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. सध्या कडक उन्हाचा तडाखा बसत असून दिवसेंदिवस उष्मा वाढत चालला आहे.



अशा परिस्थितीत तालुक्यातील वावोशी, बीड खुर्द, केलवली, जांबरुंग, खरवई, गोराठण बु. ही सहा गावे आणि तलवली दांडवाडी, माणिकनगर तळवली कातकरवाडी, रानसई आदिवासी वाडी, ढेबेवाडी बर्गेवाडी, बीड खुर्द आदिवासी वाडी, बीड खुर्द बौद्धवाडा, केलवली आदिवासी वाडी, उंबरना ठाकूरवाडी, जांबरुंग बौद्धवाडा, खडईवाडी, नागेश्वर नगर आदिवासी वाडी, गोळेवाडी गणेश नगर, गारमाळ आणि परखंदे धनगरवाडा या १४ वाड्या भीषण पाणी टंचाईने त्रस्त आहेत.या ६ गावे व १४ वाड्यांसाठी ५ टँकर आणि १ पिकअपद्वारे एकवेळ पाणीपुरवठा केला जात आहे.

सुमारे १०,३०९ लोकांना आणि १,१८२ पाळीव प्राण्यांना पाणीपुरवठा करण्याचा प्रयत्न सुरू आहे. उपाय म्हणून टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असला तरी स्थानिक लोकप्रतिनिधी टँकरद्वारे पाणीपुरवठा म्हणजे भूषण समजत असतील तर ही बाब चिंताजनक आहे.खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत खरीवली ही देशात जलसमृद्ध ग्रामपंचायत म्हणून नावारूपाला आली आहे. नुकताच दिल्ली येथे या ग्रामपंचायतीने पुरस्कारही स्वीकारला आहे. त्याच खालापूर तालुक्यात ६ गावे आणि १४ वाड्या भीषण पाणी टंचाईने त्रस्त आहेत.

तालुक्यातील ग्रामस्थांनी जलसमृद्ध गाव खरीवलीला भेट देऊन आपले गावही जलसमृद्ध करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.खालापूर तालुक्यात तीन धरणे, एक वळण बंधारा आणि नवी मुंबईला पाणीपुरवठा करणारे मोरबे धरण आणि वर्षभर वाहणारी पाताळगंगा नदी असताना अशी पाणीटंचाई निर्माण होणे हेच तालुक्याचे दुर्भाग्य आहे.

## पराडेत भरधाव कारची समोरून येणाऱ्या दुचाकीला जोरदार धडक; दोघे गंभीर

**रसायनी : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पराडे कॉर्नर येथे भरधाव वेगाने धावणाऱ्या रेंज रोव्हर कारने समोरून येणाऱ्या दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दुचाकीवरील दोनजण गंभीर जखमी झाल्याची धक्कादायक घटना दि.१७ जून रोजी रात्री सुमारे ९.४५ वाजता घडली. अपघातानंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एमएच–४६–बीए–४८१८ क्रमांकाची रेंज रोव्हर कार वावेघरकडून भरधाव वेगाने येत होती.कारचा चालक जनार्दन शंकर माळी (रा.कासप,ता.पनवेल) याचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि समोरून येणाऱ्या एमएच–०३–एपी–०८५० क्रमांकाच्या मोटारसायकलला जोरदार धडक बसली. या अपघातात मोटारसायकलवरील शिवराज भीमा चव्हाण (वय ४६),सध्या रिस ड्रीम बंगला, ता.खालापूर; मूळ रा. वावेघर,ता.पनवेल) तसेच त्यांच्यासोबत असलेले रेवन सिद्धप्पा नागशेट्टी मेलकरी (वय ४६, रा.वावेघर,ता. पनवेल) गंभीर जखमी झाले. दोघांनाही तातडीने पनवेल येथील पुरोहित हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू आहेत.

या प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.आरोपी चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता,२०२३ मधील कलम २८१ व १२५(अ)(ब) तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४,१८५ आणि १४६/१९६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या अपघाताचा पुढील तपास हवालदार सुरेश पवार करीत आहेत.

## तळा शहरात पाणीपातळी घटली; धरण, तलाव कोरडे

**तळा : प्रतिनिधी**

तळा शहरातील तहसील कार्यालयाजवळील धरणाच्या पाण्याची पातळी झपाट्याने खालावली असून यावर्षी पावसाने दडी मारल्याने पाझर तलावाचे पाणीही आटले आहे. परिणामी शहरावर पाणी संकटाचे सावट निर्माण झाले आहे. या धरणाच्या पाण्याचा तळ्यातील गुरांसाठी व कपडे धुण्यासाठी मोठा उपयोग होत होता, मात्र पाण्याची पातळी खाली गेल्याने गुरांच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे.



याच धरणाच्या शेजारी खालच्या बाजूला असलेल्या बोअरवेलमधून अर्ध्या शहराला पाणीपुरवठा केला जात आहे, परंतु बोअरवेलचे पाणीसुद्धा कमी झाले आहे. तळा शहराला सध्या दोन ते तीन दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. तज्ज्ञांच्या मते सदर धरणाचा गाळ काढण्याचे काम तातडीने करणे गरजेचे आहे. मात्र काही दिवसांवर पाऊस असल्याने हे काम पूर्ण होईल असे वाटत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. यावर्षी काम झाले नाही तरी पुढील वर्षी गाळ काढावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. युद्धपातळीवर काम केल्यास यावर्षीही गाळ काढणे शक्य असल्याचे नागरिक सांगतात. धरणाचा गाळ काढून खोली वाढवल्यास तेथे सुशोभीकरण करून बोटिंगही सुरू करता येईल. यामुळे उत्पन्न वाढेल आणि पाण्याचा स्त्रोत वाढून तळेकरांसाठी तो एक आधार ठरू शकेल, अशी भावना व्यक्त होत आहे.

## टोकेखार–तुरुंबाडी पुलाचे काम वेगात

**मुरुड : प्रतिनिधी**

कोकणातील सागरी महामार्गाचे माजी मुख्यमंत्री बॅ. ए. आर. अंतुले यांचे स्वप्न लवकरच साकार होणार आहे. या महामार्गातील मुरुड आणि म्हसळा या दोन महत्त्वाच्या तालुक्यांना जोडणाऱ्या टोकेखार–तुरुंबाडी सागरी पुलाचे काम वेगाने सुरू असून समुद्र खाडीतील ७० टक्के पिलर्सचे काम पूर्ण झाले आहे. आगरदांडा खाडीवरील हा पूल रायगड जिल्ह्यातील अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प असून सुमारे ४.३ किमी लांबीचा आहे.

८०९ कोटींचा हा प्रकल्प असून बांधकामाचा ठेका एचसीसी इंडिया कंपनीकडे आहे. जानेवारी २०२६ पासून प्रकल्पाचे बांधकाम वेगाने सुरू असून पूल प्रत्यक्ष स्वरूपात दिसू लागला आहे. समुद्रातील अनेक पिलर्स उभे करण्यात आले असून पिलर्सवर कॅपिंग बीमचे काम सुरू आहे. दोन्ही बाजूंच्या ॲप्रोच रस्त्यांचे कामही सुरू आहे. प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण करण्यासाठी यंत्रसामग्री आणि मनुष्यबळ वाढवण्यात आले आहे. या सागरी पुलामुळे मुरुडसह श्रीवर्धन, म्हसळा आणि दिघी परिसरातील प्रवासासाठी मोठा वळसा टाळता येणार आहे. फेरीबोट किंवा खाडीभोवतीचा लांब रस्ता वापरण्याची गरज कमी होईल. दिघी पोर्टपर्यंत मालवाहतूक अधिक जलद होईल. औद्योगिक गुंतवणूक आणि लॉजिस्टिक्स क्षेत्राला चालना मिळेल.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे ऐतिहासिक जंजिरा व पद्मदुर्ग किल्ले, दिवेआगर, हरिहरेश्वर बीच, श्रीवर्धन बीच या पर्यटन स्थळांपर्यंत पोहोचणे सोपे होणार असून पर्यटनाला मोठी चालना मिळणार आहे.

## मान्सून सक्रिय होण्याची चिन्हे

**खोपोली : प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून उकाडा, ढगाळ वातावरण आणि पावसाच्या प्रतिक्षेमुळे त्रस्त झालेल्या खोपोली परिसरातील नागरिक, शेतकरी, व्यापारी आणि औद्योगिक क्षेत्राला अखेर दिलासा मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. उशिरा का होईना, मान्सून सक्रिय होण्यास पोषक वातावरण निर्माण झाल्याने सर्वच स्तरातून समाधान व्यक्त केले जात आहे. हवामानातील बदल, वाढलेली आर्द्रता, ढगांची दाटी आणि अधूनमधून पडणाऱ्या सरींमुळे आता लवकरच जोरदार पावसाची सुरुवात होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

यंदा मान्सूनचे आगमन अपेक्षेपेक्षा उशिरा झाल्याने ग्रामीण व शहरी भागात चिंता निर्माण झाली होती. विशेषतः शेतकऱ्यांनी पेरणीपूर्व मशागत करून पावसाची वाट पाहत शेतजमीन तयार ठेवली होती. मात्र पावसाने हुलकावणी दिल्याने खरीप हंगामाच्या नियोजनावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात होती. भात, नागली, भाजीपाला आणि इतर पिकांच्या लागवडीसाठी आवश्यक असलेला पाऊस वेळेवर न पडल्याने शेतकरी वर्ग चिंतेत होता. आता वातावरणात झालेल्या बदलामुळे पावसाला अनुकूल परिस्थिती निर्माण होत असून, पुढील काही दिवसांत चांगला पाऊस झाल्यास खरीप हंगामाला नवसंजीवनी मिळण्याची शक्यता आहे.

मान्सून लांबल्यामुळे पाणीटंचाईची समस्या देखील गंभीर बनू लागली होती. अनेक भागांतील विहिरी, बोअरवेल आणि लहान जलस्रोतांची पातळी घटल्याने नागरिकांना पाणी वापरात काटकसर करावी लागत होती. काही ठिकाणी पिण्याच्या पाण्याबाबत चिंता व्यक्त होत होती. मात्र आता मान्सून सक्रिय होण्याच्या हालचालींमुळे जलसाठे वाढण्याची आशा निर्माण झाली आहे. धरणे, तलाव आणि नाले पुन्हा भरू लागल्यास शहर व ग्रामीण भागातील पाणीपुरवठा व्यवस्थेलाही मोठा दिलासा मिळणार आहे.

औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाच्या खोपोली परिसरातील कंपन्या व कारखान्यांनाही पावसाची प्रतीक्षा होती. पाण्याचा तुटवडा, उष्णतेमुळे कामगारांवर होणारा परिणाम, तसेच काही ठिकाणी उत्पादन प्रक्रियेवर होणारा अप्रत्यक्ष परिणाम यामुळे उद्योगक्षेत्रही चिंतेत होते. पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण होऊन औद्योगिक परिसरातील उष्णता कमी होण्यास मदत होणार असून पाणी उपलब्धतेच्या दृष्टीनेही परिस्थिती सुधारण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

व्यापारी, लहान उद्योजक आणि सर्वसामान्य नागरिकांनाही मान्सूनच्या हालचालींमुळे मोठा दिलासा मिळाला आहे. उन्हाळा आणि उकाड्यामुळे बाजारपेठांमध्ये ग्राहकांची वर्दळ काही प्रमाणात घटली होती. तर दुसरीकडे, पावसाच्या आगमनाने वातावरणात प्रसन्नता निर्माण होऊन बाजारपेठांनाही चालना मिळण्याची शक्यता आहे.

### इंग्लंडविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी भारतीय संघ जाहीर

# रोहित, विराट, बुमराहचे कमबॅक!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंग्लंडविरुद्ध होणाऱ्या आगामी तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी भारतीय क्रिकेट संघाची घोषणा करण्यात आली आहे. युवा वेगवान गोलंदाज हर्षीत राणाला टीम इंडियात स्थान मिळाले असून स्टार फलंदाज रोहित शर्मा आणि विराट कोहली तसेच अनुभवी गोलंदाज जसप्रीत बुमराहचाही संघात समावेश करण्यात आला आहे. या मालिकेत भारताचा युवा सलामीवीर शुबमन गिल भारताचे नेतृत्व करणार आहे.




मालिकेतील पहिला सामना १४ जुलै रोजी एजबेस्टन मैदानावर होणार आहे. त्यानंतर दुसरा एकदिवसीय सामना १६ जुलै रोजी कार्डिफ येथील सोफिया गार्डन्स मैदानावर खेळवला जाईल. मालिकेतील तिसरा आणि अंतिम सामना १९ जुलै रोजी क्रिकेटची पंढरी मानल्या जाणाऱ्या लॉर्ड्स मैदानावर रंगणार आहे. रोहित शर्मा, विराट कोहली, जसप्रीत बुमराह यांसारखे अनुभवी खेळाडू मैदानात उतरणार असल्याने मालिकेत चुरशीचे सामने पहायला मिळण्याची अपेक्षा आहे.

इंग्लंडविरुद्धची ही मालिका भारतीय संघासाठी महत्त्वाची मानली जात असून अनुभवी आणि युवा खेळाडूंच्या संतुलित मिश्रणामुळे संघाकडून दमदार कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**संघ :** शुबमन गिल (कर्णधार), रोहित शर्मा, विराट कोहली, श्रेयस अय्यर (उपकर्णधार), के एल राहुल (यष्टिरक्षक), इशान किशन (यष्टिरक्षक), वॉशिंग्टन सुंदर, अक्षर पटेल, नितीश कुमार रेड्डी, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, प्रसिद्ध कृष्णा, हर्षित राणा, अर्शदीप सिंग, गुरनूर ब्रार.



## यशस्वी जयस्वालचा शतकांचा विक्रम

**लखनऊ : वृत्तसंस्था**

भारताकडून वनडे करिअरमध्ये सर्वात कमी डावांत पहिली दोन शतके झळकावण्याचा विक्रम आता यशस्वी जयस्वालच्या नावावर नोंदवला गाले आहे. त्याने अवघ्या सहाव्या डावातच हा पराक्रम केला.

यापूर्वी हा विक्रम शिखर धवनच्या नावावर होता, ज्याने सात डावात दोन शतके ठोकली होती. केदार जाधवने नऊ डावात पहिले दोन शतके ठोकली होती. या यादीत विराट कोहली (१७वा डाव) आणि शुबमन गिल (१८वा डाव) बरेच मागे आहेत.

तिसऱ्या वनडेमध्ये प्रथम फलंदाजी करत अफगाणिस्तानने भारतासमोर २१८ धावांचे लक्ष ठेवले होते. अफगाणिस्तानकडून कर्णधार हशमतुल्लाह शाहिदीने कारकिर्दीतील पहिले शतक ठोकले. प्रत्युत्तरात भारताने २८.४ षटकांतच हे लक्ष्य गाठले. या सामन्यात जयस्वालने ११० आणि रोहित शर्माने ७९ धावांची जबरदस्त खेळी केली.

# वैभव सूर्यवंशीचे विक्रमी अर्धशतक

**कोलंबो : वृत्तसंस्था**

श्रीलंकेत सुरू असलेल्या तिरंगी मालिकेतील साखळी फेरीत मोठी खेळी करण्यात अपयशी ठरललेल्या वैभव सूर्यवंशीने रविवारी (दि.२१) फायनलमध्ये आपल्या फलंदाजीचा रुद्रावतार दाखवला. पहिल्या चेंडूपासून चौकार षटकारांची बरसात करत वैभव सूर्यवंशीने अवघ्या ११ चेंडूत ४५४.५४च्या भन्नाट स्ट्राईक रेटसह ५० धावांची विक्रमी अर्धशतकी खेळी केली.

वैभवने ठोकलेले अर्धशतक लिस्ट ए क्रिकेटमधील सर्वात वेगवान अर्धशतक ठरले. या खेळीदरम्यान त्याने कौशल्या विरारत्नेचा विक्रम मोडला, ज्याने १२ चेंडूत अर्धशतक केले होते.

अंतिम लढतीत श्रीलंकेच्या संघाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला, मात्र वैभव सूर्यवंशी आणि प्रियांश आर्य या भारतीय सलामीवीरांनी या संधीचा लाभ घेत श्रीलंकन गोलंदाजांची धुलाई सुरू केली. त्यात वैभवने तर खेळलेल्या पहिल्याच चेंडूवर चौकार ठोकत आक्रमक सुरुवात केली.

दरम्यान, श्रीलंका अ संघाकडून सिराझने टाकलेल्या तिसऱ्या षटकात वैभवने तीन षटकार आणि दोन चौकारांसह २८ धावा चोपून काढल्या. त्यानंतर पुढच्या षटकात आणखी १६ धावा वसूल करत त्याने अवघ्या ११ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले.



लिस्ट ए क्रिकेटमधील सर्वात वेगवान अर्धशतकाची नोंद करताना वैभवने पाच चौकार आणि पाच षटकार ठोकले. उल्लेखनीय बाब म्हणजे या पन्नास धावा वैभवने केवळ चौकार आणि षटकारांच्या मदतीनेच काढल्या. यादरम्यान, त्याने एकही धाव धावून काढली नाही. सरतेशेवटी केवळ २९ चेंडूत १० चौकार आणि आठ षटकारांनिशी ९४ धावांची खेळी करून तो बाद झाला. आता पुढच्या चेंडूवर वैभवने षटकार ठोकला असता, तर लिस्ट ए क्रिकेटमध्ये सर्वात वेगवान शतकाच्या संयुक्त विश्वविक्रमाशी वैभवला बरोबरी करता आली असती, पण ही संधी त्याच्या हातून निसटली.

# जो रूटची ऐतिहासिक कामगिरी!

## मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा महारेकॉर्ड मोडला

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात सुरू असलेल्या तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील दुसरा सामना लंडनमधील केनिंग्टन ओव्हल मैदानावर खेळवला जात आहे. या सामन्यात इंग्लंडचा अनुभवी फलंदाज जो रूट याने आणखी एका ऐतिहासिक टप्प्याला गवसणी घालत कसोटी क्रिकेटमध्ये १४ हजार धावा पूर्ण करण्याचा पराक्रम केला.

चौथ्या दिवशी फलंदाजीसाठी मैदानात उतरलेल्या रूटने आपल्या डावात दोन धावा पूर्ण करताच हा विक्रम आपल्या नावावर केला. कसोटी क्रिकेटच्या इतिहासात सर्वात जलद १४ हजार धावांचा टप्पा गाठणारा तो पहिला क्रिकेटपटू ठरला आहे. याआधी हा विक्रम मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर यांच्या नावावर होता.

कसोटी क्रिकेटमध्ये जो रूटने आपल्या १६५व्या कसोटीतच १४ हजारांचा टप्पा गाठला, तर सचिन




तेंडुलकरने १७१ कसोटी सामन्यात १४ हजार धावा पूर्ण केल्या होत्या. ओव्हल कसोटीच्या चौथ्या दिवशी रूटने आणखी एक मोठी उपलब्धी आपल्या नावावर केली. तो न्यूझीलंडविरुद्ध कसोटी क्रिकेटमध्ये दोन धावा पूर्ण करणारा पहिला फलंदाज ठरला आहे.

कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम सचिन तेंडुलकरच्या नावावर अबाधित आहे. सचिनने कसोटी कारकिर्दीत एकूण १५ हजार ९५१ धावा केल्या आहेत. त्यानंतर या यादीत जो रूट १४ हजार ०७३ धावांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे.

# फिफा वर्ल्डकपमध्ये जर्मनीची बाद फेरीत धडक

**टोरंटो : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक स्पर्धेच्या दहाव्या दिवशी जर्मनी आणि नेदरलँड्सने आपापल्या सामन्यांमध्ये एकतर्फी विजय नोंदवला. यामुळे बाद फेरीचे (नॉकआउट) चित्र अधिक स्पष्ट झाले आहे, तर ग्रुप 'इ' मधील इक्वाडोर आणि कुराकाओ यांच्यातील सामना अनिर्णित (ड्रॉ) राहिला.

ग्रुप 'इ' मधील सामन्यात जर्मनीने शानदार पुनरागमन करत आयव्हरी कोस्टचा २–१ असा पराभव केला. टोरंटो स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात एकवेळ जर्मन संघ मागे पडला होता, परंतु डेनिज उन्दावच्या दोन गोलच्या जोरावर त्यांनी विजय मिळवला.



६८व्या मिनिटाला सब्स्टीट्यूट डेनिज उन्दावने शानदार गोल करत संघाला १–१ अशी बरोबरी साधून दिली. या गोलनंतर सामना अधिकच रोमांचक झाला. आठ मिनिटांच्या इंज्युरी टाईमनंतर पंचांनी (रेफ्री) अंतिम शिट्टी वाजवली आणि जर्मनीने २–१ने सामना आपल्या नावावर केला.

ग्रुप 'एफ'मधील सामन्यात नेदरलँड्सने दमदार कामगिरी करत स्वीडनचा ५–१ असा दणदणीत पराभव केला. ह्युस्टन स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात नेदरलँड्सने सुरुवातीपासूनच सामन्यावर पकड मिळवली आणि स्वीडनला पुनरागमन करण्याची एकही संधी दिली नाही.

इक्वाडोर आणि कुराकाओ यांच्यात ग्रुप 'इ' चा सामना खेळला गेला. एकही गोल न झाल्यामुळे सामना गोलशून्य बरोबरीत (०–०) संपला.

## नेदरलँड्सकडून स्वीडनचा धुव्वा

**ह्यूस्टन : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक स्पर्धेत ग्रुप एफमधील सामन्यात नेदरलँड्सने स्वीडनचा ५–१ अशा मोठ्या फरकाने पराभव करत स्पर्धेतील पहिला विजय नोंदवला. या विजयासह नेदरलँड्सच्या खात्यात चार गुण जमा झाले आहेत.

सामन्याच्या पहिल्या सत्रात ब्रायन ब्रॉबी याने अवघ्या १७ मिनिटांच्या कालावधीत दोन गोल करत नेदरलँड्सला मजबूत आघाडी मिळवून दिली. त्यानंतर दुसऱ्या सत्रात कोडी गाक्पो यानेही दोन गोल करत संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. क्रायसेन्सिओ समरविल याने लांब पल्ल्याचा शानदार गोल करत नेदरलँड्सच्या गोलसंख्येत भर घातली. स्वीडनने आक्रमणात अनेक संधी निर्माण केल्या, मात्र त्यांचे प्रयत्न डच गोलरक्षक बार्ट व्हर्ब्रुगेन याने हाणून पाडले. रॉनाल्ड कोमन यांच्या मार्गदर्शनाखाली खेळणाऱ्या नेदरलँड्ससाठी हा विश्वचषकातील पहिला विजय ठरला.







पनवेल : जागतिक योग दिनानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हा आयोजित चलो प्रबळगड कलावंतीण सुळका ट्रेक या विशेष उपक्रमात भाजप प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांनी सहभाग घेतला आणि योग, साहस, निसर्गाचा सुंदर संगम माची येथे अनुभवला. या उपक्रमाद्वारे युवकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.













उलवे नोड : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे आयोजित योग कार्यक्रमात पनवेल महापालिकेचे नगरसेवक परेश ठाकूर यांनी सहभाग घेतला. या उपक्रमातून निरोगी जीवनशैलीचा संदेश प्रभावीपणे पोहचल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com